**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीत अनुवाद)**

**[२०२३] ५ एस. सी. आर. ९४९**

**युनियन ऑफ इंडिया आणि इतर**

**विरुद्ध**

**डेलॉयट हास्किन्स आणि सेल्स एलएलपी आणि इतर**

**(फौजदारी अपील क्रमांक २३०५-२३०७/२०२२)**

**मे ०३, २०२३**

**[एम. आर. शाह, न्यायमूर्ति, आणि एम. एम. सुंदरेश, न्यायमूर्ति ]**

*कंपनी कायदा, २०१३ - कलम १४०(५) - चे विश्लेषण आणि निर्वचन - लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतर कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाहीची योग्यता - कलम १४०(५) न्यायाधिकरणाला (एनसीएलटी) (NCLT) एकतर स्वतःहून किंवा केंद्र सरकारने किंवा संबंधित कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अर्जावर, ज्या लेखापरीक्षकाने फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनीच्या कर्मचारी व्यवस्थापनास फसवणुकीस प्रवृत्त करत आहे किंवा संगनमत करत आहे, त्या लेखापरीक्षकाच्या विरोधात कारवाई करण्याचा अधिकार देते - जर चौकशी पूर्ण झाल्यावर न्यायाधिकरणाला असे आढळून आले की कंपनीच्या लेखापरीक्षकाने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसवणूक केली आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकारी यांच्याद्वारे किंवा त्यांच्या संबंधाद्वारे कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे, तर ते आदेशाद्वारे कंपनीला त्याचे लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देऊ शकते - या आक्षेपित न्यायनिर्णयाद्वारे, उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की एकदा लेखापरीक्षकाने लेखापरीक्षक म्हणून राजीनामा दिला की किंवा त्याच्या राजीनाम्यानुसार जर तो आता*

*लेखापरीक्षक नसेल तर त्यानंतर कलम १४०(५) अन्वये कार्यवाही कायम ठेवण्यायोग्य नाही - लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतर, कलम १४०(५) ची कार्यवाही कायम ठेवण्यायोग्य आहे किंवा काय - निर्णय : उच्च न्यायालयाने घेतलेला दृष्टिकोन निर्विवादपणे चुकीचा आहे आणि न टिकण्याजोगा आहे - संबंधित लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतरही कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) खाली अर्ज/कार्यवाही कायम ठेवण्यायोग्य आहे - कलम १४०(५) च्या पहिल्या भागानुसार सुरू केलेली चौकशी/कार्यवाही त्याच्या तर्कशुध्द शेवटापर्यंत गेली पाहिजे आणि त्यानंतरचा राजीनामा आणि/किंवा लेखापरीक्षकाची खंडित सेवा यामुळे कलम १४०(५) अन्वये चौकशी/कार्यवाही संपुष्टात येणार नाही - उच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार एकदा जर लेखा परिक्षकाने राजीनामा दिला तर कलम १४०(५) अन्वये कार्यवाही संपुष्टात येईल आणि पुढील कार्यवाहीची गरज भासणार नाही, अशा परिस्थितीत लेखा परिक्षक कलम १४०(५) च्या दुसऱ्या परंतुकांतर्गत उपबंधित केल्यानुसार अंतिम आदेश व त्याचे परिणाम टाळण्यासाठी राजीनामा देऊ शकतो आणि न्यायाधिकरणाचा कोणताही अंतिम आदेश टाळू शकतो - विधिमंडळाचा तो हेतू असू शकत नाही - एनसीएलटी (NCLT), कायद्यानुसार चौकशी करून अशा अर्जावर अंतिम आदेश पारित करेल आणि त्यानंतर अशा अंतिम आदेशाच्या आधारे, कलम १४०(५) च्या दुसऱ्या परंतुकांतर्गत उपबंधित केल्यानुसार पुढील परिणाम असतील.*

*कंपनी कायदा, २०१३ - कलम १४०(५) - ची संविधानात्मक विधिग्राह्यता - कलम १४०(५) न्यायाधिकरणाला (एनसीएलटी) (NCLT) एकतर स्वतःहून किंवा केंद्र सरकारने किंवा संबंधित कोणत्याही व्यक्तीने*

*केलेल्या अर्जावर, ज्या लेखापरीक्षकाने फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनीच्या व्यवस्थापनास फसवणुकीस प्रवृत्त करत आहे किंवा संगनमत करत आहे, त्या लेखापरीक्षकाच्या विरोधात कारवाई करण्याचा अधिकार देते - जर चौकशी पूर्ण झाल्यावर न्यायाधिकरणाला असे आढळून आले की कंपनीच्या लेखापरीक्षकाने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसवणूक केली आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकारी यांच्याद्वारे किंवा त्यांच्या संबंधाद्वारे कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे, तर ते आदेशाद्वारे कंपनीला त्याचे लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देऊ शकते - निर्णय : कलम १४०(५) भेदभावकारी, स्वेच्छानुसारी नाही किंवा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १९(१)(जी) चे उल्लंघन करणाराही नाही – एनसीएलटी (NCLT), दिवाणी न्यायालयाप्रमाणेच सर्व अधिकारांसह कलम १४०(५) अन्वये न्यायिकवत अधिकारांचा वापर करते - कोणताही अंतिम आदेश पारित करण्यापूर्वी एनसीएलटी (NCLT) द्वारे पुरेशी संधी दिली जाते - प्रतिकथन असे आहे की हे समर्थनीय नाही की कलम १४०(५), संचालक, व्यवस्थापक इत्यादी सारख्याच अभिकथित अयोग्य कृत्य करणाऱ्याच्या तुलनेत लेखापरिक्षकांशी अन्यायकारकपणे भेदभाव करते कारण लेखापरीक्षकाची भूमिका संचालक आणि/किंवा व्यवस्थापनांशी समकृत केली जाऊ शकत नाही - एखाद्या लेखापरीक्षकाद्वारे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसव्या पद्धतीने काम करणे हे एक अतिशय गंभीर गैरवर्तन आहे आणि त्यामुळे अशा फसव्या कृत्यात गुंतण्याचे आवश्यक परिणाम होतील - एखाद्या लेखापरीक्षकाला इतर तरतुदींखाली कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून काढून टाकले जाऊ शकते, केवळ या कारणास्तव, कलम १४०(५) जे एका विशिष्ट उद्दिष्टाने आणि हेतूने अधिनियमित केले गेले आहे ते*

*स्वेच्छानुसारी आणि/किंवा अधिकारबाह्य असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही - भारताचे संविधान - अनुच्छेद १४ आणि १९(१)(जी).*

*कंपनी कायदा, २०१३ - कलम १४०(५), पहिला परंतुक - कलम १४०(५) च्या पहिल्या परंतुकाखाली अधिकार - चे स्वरूप - निर्णय : विद्यमान लेखापरीक्षकाची सेवा अखंडित ठेवण्यापासून रोखण्यासाठी तसेच फसवणूक झाली आहे अशा सकृतदर्शनी पूर्तीच्या आधारे, त्याजागी दुसऱ्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यासाठी  व जेव्हा परिस्थिती बदलण्याची मागणी असते तेव्हा हा अंतरिम किंवा तात्पुरता उपाय असल्याचे म्हटले जाऊ शकते - असा आदेश हा कायद्याच्या कलम १४०(५) मध्ये प्रदान केल्यानुसार तपशीलवार चौकशी प्रलंबित असताना आणि न्यायाधिकरणाने कोणताही अंतिम आदेश पारित करण्यापूर्वी तात्पुरत्या निलंबनासारखा अंतरिम आदेश असल्याचे म्हटले जाऊ शकते.*

*कंपनी कायदा, २०१३ - कलम १४०(५), दुसरा परंतुक - चे उद्दिष्ट आणि हेतू - केव्हा लागू होतो - निर्णय : कलम १४०(५) च्या दुसऱ्या परंतुकाचे उद्दिष्ट आणि हेतू ही तरतूद अधिक कठोर करणे आहे आणि लेखापरीक्षकासाठी परिणामांची तरतूद करणे आहे जेव्हा असे आढळून येते की लेखापरीक्षक फसवणूक करत आहे आणि एनसीएलटी (NCLT) द्वारे अशा फसवणुकीसाठी त्याला काढून टाकले जाते - कलम १४०(५) चे दुसरे परंतुक लागू होण्यापूर्वी , कलम १४०(५) च्या पहिल्या भागानुसार कंपनीच्या लेखापरीक्षकाच्या विरोधात तपशीलवार चौकशी होणे आवश्यक आहे आणि एनसीएलटी (NCLT) द्वारे अशा निष्कर्षाप्रत येणे आवश्यक आहे की कंपनीच्या लेखापरीक्षकाने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसवणूक केली आहे*

*किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधित कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे.*

*कंपनी कायदा, २०१३ - कलम १४०(५) - न्यायाधिकरणाला कलम १४०(५) खाली प्रदान केलेले अधिकार - कायदा, २०१३ च्या तरतुदीखाली किंवा सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखाली कोणत्याही कारवाईवर पूर्वग्रह नसेल तर - निर्णय : कायदा, २०१३ च्या इतर कोणत्याही तरतुदींची पर्वा न करता, न्यायाधिकरणाकडे कलम १४०(५) अंतर्गत कंपनीच्या अशा लेखापरीक्षकाच्या विरोधात अंतिम आदेश पारित करण्याचे अधिकार आहेत  ज्याच्यावर हा आरोप आहे कि त्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे.*

*कंपनी कायदा, २०१३ - कलम २१२(१४) - भारताच्या संघराज्याने गंभीर फसवणूक तपास कार्यालयाला (एसएफआयओ)(SFIO) निर्गमित केलेला  कलम २१२(१४) चा निर्देश उच्च न्यायालयाने रद्दबातल केला आणि अपास्त केला - परिणामी एसएफआयओ (SFIO) ने दाखल केलेला खटला रद्दबातल केला - उच्च न्यायालयाने मुख्यतः दोन कारणांवर, २१२(१४) निर्देश रद्दबातल केले आहे, प्रथमतः  या कारणावर की, एसएफआयओ (SFIO) अहवालाच्या ३० तासांच्या आत खटला चालवण्याचे निर्देश निर्गमित करण्यात आले होते, जे बुद्धीचा वापर केला गेला नाही असे निर्देशित करते, दुसरे या कारणावर की, एसएफआयओ (SFIO) चा तपास पूर्ण झालेला नव्हता त्यामुळे एसएफआयओ (SFIO) अहवाल अपूर्ण अहवाल होता आणि म्हणून कलम २१२(१४) चे निर्देश अक्षम होते - निर्णय : ३० तासांच्या आत खटला*

*चालविण्याचे निर्देश निर्गमित करण्यात आले होते, केवळ या कारणास्तव, त्याद्वारेच, असे गृहीत धरले जाऊ शकत नाही की तेथे बुद्धीचा वापर केला गेला नाही - काय विचारात घेणे आवश्यक होते ते म्हणजे म्हणजे खटला चालविण्यासाठी काही पुरावा होता की नाही व खटला चालविण्याचे निर्देश योग्यरितीने देण्यात आले होते की नाही - उच्च न्यायालयाने देखील योग्यरीत्या समजून घेतले नाही की एसएफआयओ (SFIO) अहवाल हा आयएफआयएन (IFIN) चा तपास पूर्ण झाल्यावर तयार केलेला अहवाल होता - जी तपासाखाली असलेल्या अनेक कंपन्यांपैकी एक होती - आयएफएनओ (IFNO) ही आयएल अँड एफएस (IL & FS) समूहातील आणि वित्तीय सेवा शाखेतील उपकंपन्यांपैकी एक होती - आयएल अँड एफएस (IL & FS) समूहाच्या इतर उपकंपन्यांबाबत तपासाचा संबंध आहे, तोच चालू असावा, केवळ या कारणास्तव, या टप्प्यावर आयएफआयएन (IFIN) चा जोपर्यंत संबंध आहे तोपर्यंत अहवाल अपूर्ण होता असे निरीक्षण करण्यासाठी एक कारण असू शकत नाही - उच्च न्यायालयाने विशेषतः चूक केली की आयएफएन (IFIN) च्या बाबत तपास अपूर्ण होता - कलम २१२(१४) अन्वये उच्च न्यायालयासमोरील कार्यवाही खटल्यास मान्यता देण्यास व खटला चालू करण्यास मंजुरी देण्यासाठी निर्देश देण्याच्या टप्प्यावर होती - संबंधित आरोपीला पुरेशी संधी उपलब्ध होती - त्यामुळे उच्च न्यायालयाने कलम २१२(१४) खाली असेलेले निर्देश रद्दबातल करून चूक केली.*

*कंपनी कायदा, २०१३ - प्रकरण X - लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षक - निर्णय : लेखापरीक्षकांची भूमिका संचालक आणि/किंवा व्यवस्थापनाशी समकृत असू शकत नाही.*

*शब्द आणि वाक्यप्रयोग - कायदा, २०१३ च्या दुसऱ्या परंतुकात वापरलेला शब्द "कोणताही" - अर्थ - कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार, न्यायाधिकरणाने दिलेल्या अंतिम आदेशानुसार, लेखापरीक्षक /संस्थेने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधित कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे, असा लेखापरीक्षक/संस्था पाच वर्षाच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र राहणार नाही - निर्णय : "कोणताही" हा शब्द महत्वपूर्ण आहे - न्यायाधिकरणाने अंतिम आदेश पारित केल्यानंतर, अशा लेखापरीक्षकाला केवळ कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून काढून टाकले जाणार नाही किंवा बदलले जाणार नाही, तर असा लेखापरीक्षक/संस्था देखील पाच वर्षांच्या कालावधीसाठी इतर 'कोणत्याही' कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास अपात्र असेल.*

**अपिले निकाली काढतांना न्यायालयाने असा निर्णय दिला**

**निर्णय : १. कलम १४०(५) च्या पहिल्या भागात एनसीएलटी (NCLT) चे अधिकार अर्ध-न्यायिक स्वरूपाचे आहेत आणि न्यायाधिकरणाला लेखापरीक्षकांच्या भूमिकेची तपासणी करण्याचे आणि त्यांच्या फसव्या वर्तनावर आणि त्यांच्या कार्याचा त्याग करण्यावर अभिनिर्णय घेण्याचे दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील. कलम १४०(५) चा पहिला भाग केंद्र सरकारने केलेल्या अर्जावर न्यायाधिकरणाला अधिकार प्रदान करतो आणि लेखापरीक्षकाचा बदल आवश्यक असल्याचे न्यायाधिकरणाला**

समाधान झाल्यास, अशा लेखापरीक्षकाला काढून टाकण्याचा आणि/किंवा असा लेखापरीक्षक लेखापरीक्षक म्हणून काम करणार नाही असा आदेश (असा अर्ज मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत) पारित करु शकतों आणि केंद्र सरकार त्याच्या जागी दुसऱ्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करू शकते. अशा प्रकारे, कलम १४० (५) च्या पहिल्या तरतुदीखालील अधिकार हे विद्यमान लेखापरीक्षकाची सेवा अखंडित ठेवण्यापासून रोखण्यासाठी तसेच फसवणूक झाली आहे अशा  परिस्थितिच्या मागणीच्या सकृतदर्शनी समाधानाच्या आधारे, त्याजागी दुसऱ्या  लेखापरीक्षकाची नियुक्ती केली जाऊ शकते. असा आदेश हा कायद्याच्या कलम १४० (५) मध्ये प्रदान केल्यानुसार तपशीलवार चौकशी प्रलंबित असताना आणि न्यायाधिकरणाने कोणताही अंतिम आदेश पारित करण्यापूर्वी तात्पुरत्या निलंबनासारखा अंतरिम आदेश असल्याचे म्हटले जाऊ शकते.[परिच्छेद ५.२][१००५- डी -जी]

२.	त्यामुळे, कलम १४०(५) ची दुसरी तरतूद ही एक मूलभूत तरतूद असल्याचे म्हटले जाऊ शकते आणि ती कलम १४०(५) (पहिला भाग) अंतर्गत न्यायाधिकरणाने पारित केलेल्या अंतिम आदेशान्वये लागू होते. २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीद्वारेही असेच केले गेले आहे. म्हणून, कलम १४०(५) ची दुसरी तरतूद, जी वर नमूद केल्याप्रमाणे, एक ठोस तरतूद आहे, ती तपशीलवार विश्लेषणानंतर आणि स्थायी समितीच्या शिफारशींचा विचार करून अधिक कठोर करण्याच्या दृष्टीने पालन केली जाते आणि जेव्हा असा लेखापरीक्षक फसवणूक करत असल्याचे आढळून येते आणि अशा फसवणुकीसाठी तो एनसीएलटी (NCLT) द्वारे काढून टाकला जातो.  कलम १४०(५) च्या पहिल्या भागांतर्गत एनसीएलटी (NCLT) ने अंतिम आदेश पारित केल्यावर आणि जर एखादा लेखापरीक्षक

फसव्या कारवायांमध्ये गुंतलेला आढळला किंवा कंपनीच्या कर्मचारी व्यवस्थापन फसवणुकीस प्रवृत्त केल्याचे किंवा संगनमत केल्याचे आढळून आले तर कलम १४०(५)च्या दुसऱ्या तरतुदीनुसार प्रदान केलेले परिणाम लागू करावेत. त्यामुळे कलम १४०(५) ची दुसरी तरतूद लागू होण्यापूर्वी, कलम १४०(५) च्या पहिल्या भागानुसार कंपनीच्या लेखापरीक्षकाच्या विरोधात सविस्तर चौकशी होणे आवश्यक आहे तसेच एनसीएलटी (NCLT) द्वारे असा निष्कर्ष निघणे आवश्यक आहे की कंपनीच्या लेखापरिक्षकाची, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसवणुकीची वृत्ती आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधाद्वारे त्याने कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन् दिले आहे किंवा संगनमत केले आहे. [परिच्छेद ५.३] [१००६ - ए -जी]

३. कलम १४०(५) अंतर्गत अर्ज दाखल केल्यानंतर लेखापरीक्षकाने दिलेल्या राजीनाम्यामुळे कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही संपुष्टात येणार नाही. असें म्हणता येणार नाही की लेखापरीक्षकाचा राजीनामा आणि/किंवा त्याला काढून टाकणे हा कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाहीचा शेवट आहे. अधिनियमाच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार ज्या लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधाद्वारे त्याने कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन् दिले आहे किंवा संगनमत केले आहे, असे कलम १४०(५), २०१३ च्या कार्यवाहीखाली चौकशीअंती आणि लेखापरीक्षकाच्या वर्तनावर न्यायाधिकरणाद्वारे अंतिम आदेश पारित करण्याचे देखील संभाव्य परिणाम आहेत. त्यामुळे, कलम १४०(५) च्या पहिल्या भागानुसार सुरू केलेली चौकशी/कार्यवाही त्याच्या

तर्कशुध्द शेवटापर्यंत गेली पाहिजे आणि त्यानंतरचा राजीनामा आणि/किंवा लेखापरीक्षकाची खंडित सेवा यामुळे कलम १४०(५) अंतर्गत चौकशी/कार्यवाही संपुष्टात येणार नाही. उच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्टिकरणानुसार लेखा परिक्षकाने राजीनामा दिल्यास कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही संपुष्टात येइल आणि पुढील कार्यवाहीची गरज भासणार नाही, अशा परिस्थीतित लेखा परिक्षक कलम १४०(५) अंतर्गत दुसऱ्या तरतुदीनूसार अंतिम आदेश व त्याचे परिणाम टाळण्यासाठी राजीनामा देऊ शकतो. विधिमंडळाचा तो हेतू असू शकत नाही. [परिच्छेद ६][१००७ - ए -डी]

४. वर नमूद केल्याप्रमाणे, कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) ची दुसरी तरतूद ही जरी तरतूद म्हणून असली तरी ती एक ठोस तरतूद आहे आणि ती कलम १४०(५) च्या पहिल्या भागात न्यायाधिकरणाने पारित केलेल्या अंतिम आदेशावर लागू होईल आणि/किंवा अवलंबून असेल. जर उच्च न्यायालयचे प्रतिपादन मान्य केले की लेखापरीक्षकाचा लगेच नंतरचा राजीनामा आणि/किंवा लेखापरीक्षकाची (सेवा) खंडित झाल्यावर कलम १४०(५) अन्वये कार्यवाही संपुष्टात येते आणि/किंवा कलम १४०(५) अन्वये केंद्र सरकारने केलेली याचिका यापुढे कायम राखण्यायोग्य नसेल आणि मान्य केली असेल तर त्या प्रकरणात, कलम १४०(५) ची दुसरी तरतूद नगण्य ठरेल आणि कोणत्याही परिस्थितीत कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत कोणतीही कारवाई केली जाणार नाही. उच्च न्यायालयाचे हे प्रतिपादन मान्य केल्यास कलम १४०(५) मध्ये दुसरी तरतूद समाविष्ट करण्याचा उद्देश आणि हेतू असफल होईल. वर म्हटल्याप्रमाणे कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीचा हेतू आणि उद्देश ही तरतूद अधिक कठोर करणे आणि अशा लेखापरीक्षकाला परिणाम प्रदान करणे आहे, जेव्हा लेखापरीक्षक फसवणूक करत असल्याचे

आढळून येते आणि अशा फसवणुकीसाठी तो एनसीएलटी (NCLT) द्वारे काढून टाकला जातो. या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार, न्यायाधिकरणाने दिलेल्या अंतिम आदेशानुसार, लेखापरीक्षक/संस्थेने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधी कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे, तो/ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र राहणार नाही. कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीत वापरलेला 'कोणताही' हा शब्द विशेष आहे. न्यायाधिकरणाने अंतिम आदेश पारित केल्यानंतर, अशा लेखापरीक्षकाला केवळ कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून काढून टाकले जाणार नाही किंवा बदलले जाणार नाही, तर असा लेखापरीक्षक/संस्था देखील पाच वर्षांच्या कालावधीसाठी इतर कोणत्याही कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास अपात्र असेल. [परिच्छेद ६. १][१००७ - ई - एच; १००८-ए -बी ]

५. म्हणून, कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) च्या खऱ्या व्याख्येनुसार आणि योजनेनुसार न्यायाधिकरणाने स्वेच्छेने किंवा केंद्र सरकारने किंवा संबंधित कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अर्जाच्या आधारे, कायद्याच्या कलम १४०(५) च्या पहिल्या भागांतर्गत एकदा चौकशी/कार्यवाही सुरू केली ती तर्कशुद्ध परिणामांपर्यंत पोहोचली पाहिजे आणि अशा चौकशी/कार्यवाहीदरम्यान लेखापरीक्षकाने राजीनामा दिला आहे की नाही या वस्तुस्थितीची पर्वा न करता न्यायाधिकरणाने अंतिम आदेश पारित करणे आवश्यक आहे की अशा लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या

पद्धतीने काम केले आहे की नाही. कलम १४०(५) च्या पहिल्या भागात दिल्याप्रमाणे कंपनीला लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देणे हा न्यायाधिकरणाने नोंदवलेल्या निष्कर्षाचा केवळ एक परिणाम आहे की लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे. कलम १४०(५) (पहिला भाग) अंतर्गत अंतिम आदेशाचा हा पहिला परिणाम आहे. कंपनीच्या लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे असा न्यायाधिकरणाने अंतिम आदेश दिल्यानंतर, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दुसरा परिणाम निदर्शनास येईल. त्यामुळे, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत प्रदान केलेल्या कोणत्याही परिणामांसाठी, कलम १४०(५) च्या पहिल्या भागानुसार न्यायाधिकरणाकडून चौकशीवर अंतिम आदेश राहील. त्यामुळे, खरे सांगायचे झाल्यास, कलम १४०(५) अंतर्गत चौकशी/कार्यवाहीदरम्यान किंवा त्यापूर्वीही कंपनीच्या लेखापरीक्षकाने राजीनामा दिल्यानंतरही, उच्च न्यायालयाने प्रतिपालन केल्याप्रमाणे आणि ठरवल्याप्रमाणे कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही संपुष्टात येणार नाही. पुनरावृत्तीच्या मोबदल्यात असे दिसून येते की दिलेल्या प्रकरणात, खरे तर ज्या लेखापरीक्षकाने कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत पुढील कोणताही परिणाम टाळण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसव्या पद्धतीने काम केले आहे आणि कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत होणारा कोणताही परिणाम टाळण्यासाठी जर तो राजीनामा देतो, तर अशी परवानगी दिली जाऊ शकत नाही. [परिच्छेद ७] [१००८ -सी -जी ]

६. १. लेखापरिक्षकांचे वतीने केलेल्या सादरीकरणाचा विचार करता कलम १४०(५) जरी नसले, तरी त्या बाबतीतही कोणताही लेखापरीक्षक फसवणूक,

फसवणुकीला प्रोत्साहन किंवा व्यावसायिक गैरवर्तन इत्यादी  करून सुटू शकत नाही आणि ते कायद्याच्या कलम १३२, १४१, १४७, २४५ आणि ४४७ वर अवलंबून राहण्याशी  संबंधित आहे, तर सुरुवातीला हे लक्षात घेणे आवश्यक आहे की उपरोक्त सर्व तरतुदी आणि कलम १४०(५) वेगवेगळ्या क्षेत्रात लागू होतात. म्हणूनच, केवळ लेखापरीक्षकाला कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून इतर तरतुदीनुसार  काढून टाकले जाऊ शकते म्हणून, कलम१४०(५) जे विशेष उद्देशाने अधिनियमित केले गेले आहे ते अनियंत्रित आणि/किंवा शक्तिबाह्य असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.[परिच्छेद ८][१००८ - एच ; १००९-ए , बी - सी]

६. २. कायद्याच्या कलम २४१(३) मध्ये वापरलेले शब्द म्हणजे "कंपनीचे आचरण आणि व्यवस्थापन २०१३ च्या अधिनियमाच्या योजनेनुसार, विशेषतः दहाव्या प्रकरणानुसार, लेखापरीक्षक खात्यांचा स्वतंत्र परीक्षक म्हणून काम करतो आणि त्याने कंपनीचे आचरण आणि कर्मचारी व्यवस्थापन पद धारण केले आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, या निवेदनाला  काहीही अर्थ नाही कि लेखा परीक्षकाने राजीनामा दिल्यानंतरही, २०१३ च्या कायद्याच्या कलम १४० (५)अंतर्गत जे साध्य करता येईल, ते कलम २४१ (३) द्वारे साध्य करता येईल. [परिच्छेद ९][१००९ - जी -एच ]

६. ३.  कलम १४०(५) मध्ये हे विशेषतः नमूद केले आहे कि "या कायद्याच्या किंवा सध्या लागू असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखालील कोणत्याही कारवाईवर पूर्वग्रह ठेऊ नये". त्यामुळे कलम १४०(५) अंमलात आणताना विधिमंडळाचा हेतू अगदी स्पष्ट आहे आणि कलम १४(५) अंतर्गत न्यायाधिकरणाला दिलेले अधिकार कंपनी कायदा,

२०१३ च्या तरतुदींखालील कोणत्याही कारवाईवर किंवा सध्या अंमलात असलेला असलेल्या इतर कोणत्याही कायद्याबाबतीत पूर्वग्रह न ठेवता असतील.त्यामुळे, २०१३ च्या कायद्यातील इतर कोणत्याही तरतुदींची पर्वा न करता, न्यायाधिकरणाकडे कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत कंपनीच्या अशा लेखापरीक्षकाच्या विरोधात अंतिम आदेश पारित करण्याचे अधिकार आहेत ज्याच्यावर हा आरोप आहे कि त्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे. [परिच्छेद १०][१०१० -ए-सी]

७. कलम १४०(५) हा युक्तिवाद केल्याप्रमाणे अतिशयोक्तीपूर्ण आणि /किंवा स्पष्टपणे मनमानी असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही. कलम १४०(५) च्या घटनात्मकता/विषयांवर मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने खटला होता की कलम १४०(५) अतिरेक आणि मनमानी आहे कारण ते फसवणुकीच्या गंभीर गुन्ह्याच्या आणि विधितः मृत्यूप्रमाणे गंभीर परिणामासह अनिवार्य अपात्रेच्या परिणामाचे निर्धारण करण्यासाठी दिशाहीन मार्गदर्शन आणि अनियंत्रित अधिकार प्रदान करते. वर नमूद केलेल्या गोष्टीला काहीही अर्थ नाही. येथे नमूद केल्याप्रमाणे, एनसीएलटी (NCLT) कलम १४०(५) अंतर्गत न्यायिकवत अधिकारांचा वापर दिवाणी न्यायालयासारख्या सर्व अधिकारांसह करेल. कोणताही अंतिम आदेश पारित करण्यापूर्वी पूर्वी एनसीएलटी (NCLT) ने पुरेशी संधी दयावी. [ परिच्छेद १२] [१०११-ए-सी ]

८. निवेदनाप्रमाणे, कलम १४०(५) हे भारतीय राज्य घटनेचे अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारे आहे आणि संचालक, व्यवस्थापक इत्यादी सारख्याच अभिकथित अयोग्य कृत्य करणाऱ्याच्या तुलनेत लेखापरिक्षकांशी अन्यायकारकपणे भेदभाव करते. हे लक्षात घेणे आवश्यक आहे कि

लेखापरीक्षकाच्या भूमिकेची तुलना संचालक आणि/किंवा व्यवस्थापन बरोबर केली जाऊ शकत नाही. लेखापरीक्षक कंपनीच्या कारभारात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात आणि म्हणून त्यांनी मोठ्या सार्वजनिक लोक हितासाठी आणि गुंतवणूकदार इत्यादीसह इतर सर्व भागधारकांसाठी काम करावे लागते. कायदयाचे १० वे प्रकरण विशेषत: लेखापरीक्षकांचे महत्त्व पाहणाऱ्या"लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षकांसाठी" ("ऑडिट आणि ऑडिटर्स")साठी आहे. म्हणून, कलम १४०(५) हे भेदभाव करणारे आणि/किंवा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारे आहे असे म्हणता येणार नाही. [ परिच्छेद १३] [१०११-सी -ई ]

९. असे सादर केले होते कि लेखापरीक्षकांना आणि भागीदारासह संपूर्ण संस्थेला स्वयंचलितपणे अपात्र ठरवण्याच्या स्वरूपात आणि तो देखील इतर कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक होण्यासाठी पाच वर्षाच्या कालावधीसाठीचा दंड अत्यंत असमान आहे. शेवटी, विधिमंडळ /संसद ने बंदी घालण्याची तरतूद करावी. संयुक्त आणि गंभीर दायित्वाच्या तत्त्वावर, लेखा परीक्षक आणि भागीदारांसह संपूर्ण संस्था जबाबदार असेल आणि म्हणून ते कलम १४०(५) आणि कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) मध्ये नमूद केलेल्या परिणामांच्या आधीन असू शकते. असे म्हणण्याची परवानगी कोणालाही दिली जाऊ शकत नाही की फसवणूक, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे करूनही, त्यांना त्यांचा व्यवसाय सुरू ठेवण्याचा आणि / किंवा पुढे चालू ठेवण्याचा अधिकार होता. एखाद्या लेखापरीक्षकाद्वारे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसव्या रीतीने वागणे हे एक अतिशय गंभीर गैरवर्तन आहे आणि म्हणून अशया फसव्या कृत्यामध्ये सहभागी होण्याचे आवश्यक परिणाम पुढे येतील. कायदयाचे कलम १४०(५) येथे विशिष्ट उद्दिष्ट आणि

हेतू अधिनियमीत केले गेले आहे आणि स्थायी समितीच्या तसेच संबंधित भागधारकांच्या शिफारशी विचारात घेऊन ते अधिनियमीत केले गेले आहे. म्हणून, कायद्याचे कलम १४०(५) ज्या उद्देशाने व हेतूने लागू केले आहे ते विचारात घेता, अभिकथित केल्याप्रमाणे, भारतीय राज्य घटनेचे अनुच्छेद १४ चे मनमानी, अतिरेक आणि उल्लंघन करणारे आणि/किंवा भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १९ (१)(जी) अंतर्गत हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारे असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही. [परिच्छेद १४] [१०११-ई -एच;१०१२ ए -सी ] .

१०.१. उच्च न्यायालयाच्या तर्कातून असे दिसते की उच्च न्यायालयाने कलम २१२(१४) अन्वये दिलेला निर्देश रद्द केला आहे आणि याला बुद्धीचा वापर न करणे असे म्हटले आहे कारण अंदाजे ७५० पानांचा आणि ३२००० पानांची जोडपत्र असलेला अहवाल ३० तासांत विचारात घेणे अशक्य होते. उच्च न्यायालयाने केलेली निरीक्षणे स्वीकारली जाऊ शकत नाही. केवळ ३० तासांच्या आत खटला चालविण्याचे निर्देश जारी करण्यात आले होते त्यामुळे बुद्धीचा वापर केला गेला नाही असे गृहीत धरले जाऊ शकत नाही. अधिकाऱ्याने सविस्तर नोंद तयार केली होती शेवटी जी अंतिम प्राधिकरणासमोर ठेवली गेली ज्याने निर्णय घेतला आणि खटला चालवण्याचे निर्देश जारी केले. खटला चालविण्यासाठी काही पुरावा आहे कि नाही आणि खटला चालविण्याचे निर्देश योग्यरीत्या देण्यात आले होते कि नाही हे विचारात घेणे आवश्यक आहे. सुनावणीदरम्यान, आरोपीला त्याचा खटला मांडण्यासाठी पुरेशी संधी दिली जाईल. त्यामुळे, उपरोक्त आधारावर, उच्च न्यायालयाने कायदाच्या कलम २१२(१४) अंतर्गत जारी केलेले खटला

चालविण्याचे निर्देश रद्द करून चूक केली  आहे. [ परिच्छेद १५. १ आणि १५.२ ] [१०१२-एफ -एच; १०१३ ए-बी ] .

१०.२. उच्च न्यायालयाने योग्य आकलन  केले नाही कि एसएफआयओ (SFIO) अहवाल हा आयएफआयएन (IFIN) - तपासाखाली असलेल्या अनेक कंपन्यांपैकी एका ची चौकशी पूर्ण केल्यावर चा अहवाल होता. आयएफआयएन (IFIN) ही  आयएल आणि एफएस (IL&FS) समूहातील आणि वित्तीय सेवा शाखेतील उपकंपन्यांपैकी एक होती. फक्त आतापर्यंत आयएलआणिएफएस(IL&FS) समुहाच्या इतर उपकंपन्यांबाबत तपासाचा संबंध आहे, तोच चालू असावा, या टप्प्यावर आयएफआयएन (IFIN )चा संबंध आहे तो अहवाल अपूर्ण होता आणि ज्यासाठी तपास सुरु होता. हे निरीक्षण करण्यासाठी आधार असू शकत नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने आयएफआयएन(IFIN) बाबतचा तपास अपूर्ण असल्याचे चुकीचे ठरवले आहे. उच्च न्यायालयासमोर कलम २१२(१४) अन्वये खटला चालवण्यास आणि खटला चालवण्यास परवानगी देण्याचा निर्देशाच्या टप्प्यावर होती. ज्या संबंधित आरोपीविरुद्ध कंपनी कायदाच्या कलम ४४७ आणि भारतीय दंड संहिताच्या इतर संबंधित तरतुदीनुसार दंडनीय गुन्ह्यांसाठी खटला चालविण्याचे आदेश देण्यात आले होते, त्यांना पुरेशी संधी उपलब्ध असेल त्यामुळे, उच्च न्यायालयाने कलम २१२(१४) अंतर्गत दिलेले निर्देश रद्द करून चूक केली आहे. [ परिच्छेद १५.३]  [१०१३- डी, ई-एफ,  एच; १०१४- बी-सी ] .

११.   कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४०(५) च्या घटनात्मक वैधतेस आव्हान देणे अयशस्वी ठरले आहे. अभिकथित  केल्याप्रमाणे, कलम १४०(५)

**हे भेदभाव किंवा मनमानी करणारे नाही आणि भारताच्या घटनेच्या अनुच्छेद १४,१९(१) (जी) चे उल्लंघन करणारे नाही. लेखापरीक्षांनी राजीनामा दिला आहे आणि त्यामुळे त्यानंतर तो कायम राखण्यायोग्य नाही हे रद्दबातल केले या आधारावर कलम १४०(५) अंतर्गत केलेला अर्ज/कार्यवाही रद्द करणारा उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निर्णय आणि आदेश याद्वारे रद्द करण्यात येतो. परिणामी, लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतरही, कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही कायम राखण्यायोग्य असेल, असा एनसीएलटी (NCLT) चा आदेश रद्द करून उच्च न्यायालयाचा आक्षेपित निर्णय आणि आदेश याद्वारे रद्द केला जातो. संबंधित लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतरही, २०१३ च्या कायदयाचे कलम १४०(५) अंतर्गत अर्ज/कार्यवाही कायम राखण्यायोग्य असल्याचे मानले जाते आणि त्यामुळे आता एनसीएलटी (NCLT) ने कायदयानुसार चौकशी केल्यानंतर अश्या अर्जावर अंतिम आदेश पारित करावा आणि त्यानंतर अशा अंतिम आदेशाच्या आधारावर, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीप्रमाणे प्रदान केल्यानुसार पुढील परिणामांचे पालन केले जाईल.[ परिच्छेद १६] [१०१४- डी-जी]**

देवास मल्टिमिडीया प्रायव्हेट लिमिटेड - विरुद्ध - अँट्रिक्स कॉर्पोरेशन लिमिटेड आणि अन्य : **(२०२३) १ एससीसी २१६**; *ऍन* अँडव्होकेट - विरुद्ध - बार कौन्सिल ऑफ इंडिया : **(१९८९) एसयुपीपी २ एससीसी २५ : [१९८८] ३ एसयुपीपीएल. एससीआर ३६१**; आयसीएआय (ICAI) -विरुद्ध - एलके रत्ना आणि इतर, **(१९८६) ४ एससीसी ५३७ : [१९८६] ३ एससीआर १०४९**; धारणी शुगर्स अँड केमिकल्स लिमिटेड - विरुद्ध - युनियन ऑफ इंडिया **(२०१९) ५ एससीसी ४८० : [२०१९] ६ एससीआर ३०७**; एसइबीआय (SEBI) -विरुद्ध - सुनील कृष्णा खेतान

**(२०२३) २ एससीसी ६४३;** तोलाराम रेलूमल -विरुद्ध - स्टेट ऑफ बॉम्बे **[१९५५] १ एससीआर १५८;** भूवलका स्टील इंडस्ट्रीज लिमिटेड आणि अन्य -विरुद्ध - युनियन ऑफ इंडिया **(२०१७) ५ एससीसी ५९८ : [२०१७] २ एससीआर ९९३;** संत लाल गुप्ता -विरुद्ध - मॉडर्न कॉऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड **(२०१०) १३ एससीसी ३३६ : [२०१०] १३ एससीआर ६२१;** बी. हिम्मतलाल अग्रवाल -विरुद्ध- कॉमपिटिशन कमिशन ऑफ इंडिया **एआयआर २०१८ एससी २८०४ : [२०१८] ४ एससीआर ४९६;** सेल्युलर ऑपेरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया -विरुद्ध - युनियन ऑफ इंडिया **(२००३) ३ एससीसी १८६ : [२००२] ५ एसयुपीपी. एससीआर २२२;** पासूपुलेती वेंकटेसवरलू -विरुद्ध - मोटर अँड जनरल ट्रेडर्स **(१९७५) १ एससीसी ७७०: [१९७५] ३ एससीआर ९५८;** कॅरोना लिमिटेड - विरुद्ध - पार्वथी स्वामिनाथन अँड सन्स **(२००७) ८ एससीसी ५५९ : [२००७] १० एससीआर ६५६;** अरुण कुमार -विरुद्ध - युनियन ऑफ इंडिया **(२००७) १ एससीसी ७३२ : [२००६] ६ एसयुपीपी. एससीआर २९०;** बलराम गर्ग -विरुद्ध - एसइबीआय (SEBI) **(२०२२) ९ एससीसी ४२५;** सिरीयस फ्रॉड इन्वेस्टीगेशन ऑफिस - -विरुद्ध - राहुल मोदी **(२०१९) ५ एससीसी २६६ : [२०१९] ५ एससीआर ९१;** मनसुखभाई विठ्ठलदास चौहान -विरुद्ध - स्टेट ऑफ गुजरात **(१९९७) ७ एससीसी ६२२ : [१९९७] ३ एसयुपीपी. एससीआर ७०५;** के. के. मिश्रा -विरुद्ध - स्टेट ऑफ मध्य प्रदेश **(२०१८) ६ एससीसी ६७६ : [२०१८] ५ एससीआर ३१५;** अनिरुद्धसिंहजी करणसिंहजी जडेजा -विरुद्ध - स्टेट ऑफ गुजरात **(१९९५) ५ एससीसी ३०२ : [१९९५] २ एसयुपीपी. एससीआर ६३७;** टी. टेक्रो -विरुद्ध - एसइबीआय (SEBI) **(२०२२) ८ एससीसी १६२**

आणि मोहम्मद इक्बाल अहमद -विरुद्ध - स्टेट ऑफ आंध्र प्रदेश **(१९७९) ४ एससीसी १७२ : [१९७९] २ एससीआर १००७ - संदर्भित.**

पी.एम.सी.मर्चंटाईल प्रायव्हेट लिमिटेड -विरुद्ध - दी स्टेट **२०१४(३) एमडब्लूएन (क्रि)(Cri) ४५४;** कमल लोचन सेन -विरुद्ध - स्टेट ऑफ ओरिसा **(१९८२) ५४ सीएलटी ५०९;** एव्ही धर्मा रेड्डी -विरुद्ध - स्टेट ऑफ ए. पी. आणि इतर **२०११ क्रिएलजे (CrLJ) १८५ - संदर्भित.**

युसूफअली मुल्ला नुभॉय -विरुद्ध - दी किंग **१९४९ क्रिएलजे** ८८९ आणि गोकुलचंद द्वारकादास मोरारका -विरुद्ध - दी किंग, **(१९४७-४८) ७५ आयए ३० - संदर्भित.**

**निर्णयविधी संदर्भ**

| | | |
|---|---|---|
| **(२०२३) १ एससीसी २१६** | **संदर्भित** | परिच्छेद ३. ६ |
| **[१९८८] ३ एसयुपीपीएल. एससीआर ३६१** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xiii) |
| **[१९८६] ३ एससीआर १०४९** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xiii) |
| **[२०१९] ६ एससीआर ३०७** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xiv) |
| **(२०२३) २ एससीसी ६४३** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xvii) |
| **[१९५५] १ एससीआर १५८** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xvii) |
| **[२०१७] २ एससीआर ९९३** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xix) |

| | | |
|---|---|---|
| **[२०१०] १३ एससीआर  ६२१** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xix) |
| **[२०१८] ४ एससीआर ४९६** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xxiv) |
| **[२००२] ५ एसयुपीपी. एससीआर २२२** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xxiv) |
| **[१९७५] ३ एससीआर ९५८** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xxiii) |
| **[२००७] १० एससीआर ६५६** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xxix) |
| **[२००६] ६ एसयुपीपी. एससीआर २९०** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xxix) |
| **(२०२२) ९ एससीसी ४२५** | **संदर्भित** | परिच्छेद ४(xxix) |
| **[२०१९] ५ एससीआर ९१** | **संदर्भित** | परिच्छेद ४.१(iv) |
| **[१९९७] ३ एसयुपीपी. एससीआर ७०५** | **संदर्भित** | परिच्छेद ४.१(xix) |
| **[२०१८] ५ एससीआर ३१५** | **संदर्भित** | परिच्छेद ४.१(xxi) |
| **[१९९५] २ एसयुपीपी. एससीआर ६३७** | **संदर्भित** | परिच्छेद ४.१(xxi) |
| **(२०२२) ८ एससीसी १६२** | **संदर्भित** | परिच्छेद ४.१(xxii) |
| **[१९७९] २ एससीआर १००७** | **संदर्भित** | परिच्छेद ४.१(xxiv) |

फौजदारी/दिवाणी अपिलीय अधिकारक्षेत्र : फौजदारी अपील क्रमांक - २३०५-२३०७/२०२२.

फौजदारी रिट याचिका क्रमांक २०१९ चे ५०२३, ५०३५ आणि ५०३६, मुंबई उच्च न्यायालयाचा दिनांक २१.०४.२०२० रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

सह

फौजदारी अपील क्रमांक २३०२-२३०३/२०२२, दिवाणी अपील क्रमांक ७९३/२०२२, फौजदारी अपील क्रमांक २२९८/२०२२, दिवाणी अपील क्रमांक ८०१/२०२२, फौजदारी अपील क्रमांक २२९९/२०२२, दिवाणी अपील क्रमांक ८७७/२०२२, फौजदारी अपील क्रमांक २३०० आणि २३०४/२०२२.

**एएसजी (ASGs**)- बलबीर सिंग, संजय जैन, **वरिष्ठ अधिवक्ता**- बालसुब्रमणियन, अरविंद दातार, व्ही. गिरी, कपिल सिब्बल, मुकुल रोहतगी, डेरियस खंबाटा, नीरज किशन कौल, सिद्धार्थ दवे, **पक्षांसाठी हजर झालेले अधिवक्ता** - नमन टंडन, समरवीर सिंग, आदित्य सिक्का, कानू अगरवाल, हिमांशू गुप्ता, विकाश कुमार झा, सुश्री. रितू आनंद, सुश्री. वसुधा विजयशील, अधिराज सिंग चौहान, सुश्री. पद्मजा शर्मा, सुश्री. निला केदार गोखले, सुश्री. संस्कृती पाठक, सुश्री. बाणी दीक्षित, अरविंद कुमार शर्मा, रजत नायर, भुवन कपूर, अनुकल्प जैन, दीपाबाली दत्ता, प्रत्युष श्रीवास्तव, सुश्री. मिशा रोहतगी मोहता, सुश्री. सुवेनि भगत, सुश्री. आयुषी शर्मा, नकुल मोहता, निश्चय निगम, महेश अगरवाल, रिषी अग्रवाल, राहुल द्वारकादास, सुश्री. प्राची धानानी, सुश्री. रिषिका हरीश, सुश्री. नियती कोहली, सुश्री. जुही बहिरवानी, प्रथम वीर अग्रवाल, सुश्री. रोहिणी जैस्वाल, सुश्री. मानवी अगरवाल, ई. सी. अग्रवाल, व्ही. पी. सिंग, आदित्य जालन, सुश्री. अनन्या

घोष, राघव सेठ, सुश्री. भाग्या के. यादव, सुश्री. वाण्या  छाब्रा, अनंत मिश्रा, सुश्री. श्रेया चौधरी, ब्रायन मोझेस, सुश्री. आकांक्षा कौल, आदीत खोराना, सुश्री. विधी ठाकूर, प्रस्तूत दळवी, चंद्रा प्रकाश, भारत बागल, सिद्धार्थ धर्माधिकारी, आदित्य अनिरुद्ध पांडे, सुश्री. कीर्ती दाढीच, सचिन पाटील.

**एम. आर. शाह, न्यायमूर्ति**

**यांनी दिलेला न्यायालयाचा निकाल**

**विचाराधीन अपील**

१. फौजदारी/दिवाणी अपीलांची तुकडी ही कंपनी कायदा, २०१३ चे कलम १४०(५) च्या संदर्भात (यापुढे 'कायदा, २०१३' असे संबोधिले जाईल) च्या व्यारव्येशी संबंधित कायद्याचे आणि आयएलअँडएफएस (IL&FS) फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड (यापुढे 'आयएफआयएन' असे संबोधिले जाईल) च्या दिनांक २८/०/२०१९ च्या तपास अहवाल (यापुढे 'आयएफआयएन (IFIN) एसएफआयओ (SFIO) अहवाल' असे संबोधिले जाईल) बाबत सामान्य प्रश्न (अनेक प्रश्न) उपस्थित करते.

१.१ युनिअन ऑफ इंडिया ने फौजदारी अपील क्रमांक २३०५-२३०७/२०२२, फौजदारी अपील क्रमांक २३०२-२३०३/२०२२ आणि फौजदारी अपील क्रमांक २३००/२०२२ इतर गोष्टींबरोबरच, मुंबई उच्च न्यायालयाने रीट याचिका क्रमांक ४१४४ आणि ४१४५ /२०१९ आणि इतर याचिकांमध्ये दिनांक २१/०४/२०२० रोजी पारित केलेले सामायिक निर्णय आणि आदेश ज्या द्वारे उच्च न्यायालयाने २०१३ च्या कायद्यातील कलम १४० (५) हे असंवैधानिक नाही हे खारीज करण्याचा आदेश ज्या द्वारे २०१३ च्या

कायद्याच्या कलम २१२ (१४) युनिअन ऑफ इंडिया ने सिरीयस फ्रॉड इन्वेस्टीगेशन ऑफिस (एसएफआयओ) यांना दिलेलं निर्देश परिणामतः एसएफआयओ (SFIO) ने विशेष न्यायालय (कंपनीस ऍक्ट) आणि अतिरिक्त सत्र न्यायधीश, ग्रेटर मुंबई यांच्या समक्ष दाखल केलेली फौजदारी तक्रार क्रमांक २०/२०१९ खारीज झाल्याने युनिअन ऑफ इंडिया आणि एसएफआयओ (SFIO) यांनी प्रस्तुत अपील (अनके अपील) दाखल केल्या आहेत.

१.२ फौजदारी अपील क्रमांक २३०२–२३०३/२०२२ मधील आव्हान आयएलअँडएफएस (IL&FS) फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या लेखापरीक्षकाशी संबंधित आहे, म्हणजे बीएसआर अँड असोसिएट्ट्स एलएलपी (बीएसआर) आणि फौजदारी अपील क्रमांक २३०५-२३०७/२०२२ मध्ये, आयएफआयएन (IFIN) च्या इतर लेखापरीक्षकाशी म्हणजे डेलॉयट हास्किन्स अँड सेल्स एलएलपी (थोडक्यात, 'डेलॉयट') आणि आयएफआयएन (IFIN) चे माजी संचालक हरि संकरन यांच्याशी संबंधित आहे.

१.३ कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) ची घटनात्मकता कायम ठेवत उच्च न्यायालयाने दिलेल्या आक्षेपित निर्णयाला आणि आदेशाला आव्हान देण्याकरिता डेलॉयट आणि त्याच्या दोन भागीदारांनी फौजदारी अपील क्रमांक २२९८/२०२२, २२९९/२०२२ आणि २३०४/२०२२ दाखल केल्या आहेत.

१.४ राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरणाने दिनांक ०४/०३/२०२० रोजी पारित केलेल्या आदेशाला आव्हान देण्याकरिता डेलॉयट आणि त्याच्या दोन भागीदारांनी दिवाणी अपील क्रमांक ७९३/२०२२, ८०१/ २०२२ आणि ८७७/२०२२ दाखल केल्या आहेत.

**<u>वस्तुस्थीची पार्श्वभूमी</u>**

२. प्रस्तुत कार्यवाहीकडे नेणारी तथ्ये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेतः

आयएलअँडएफएस (IL&FS) समूह कंपन्यांनी केलेल्या थकबाकीची मालिका, ज्यांच्यावर २०१८ च्या जून ते सप्टेंबर दरम्यान एकूण कर्जाचा भार रू. ९१,०००/- कोटी झाला ज्यामुळे भारतातील चलन बाजार कोसळण्याचा धोका निर्माण झाला, कॉर्पोरेट रोख्यांच्या उत्पन्नावर दबाव वाढला आणि शेअर बाजारात विक्रीला चालना मिळाली. दिनांक ३०/०९/२०१८ रोजी आर्थिक व्यवहार विभाग, वित्त मंत्रालयाने आयएलआणिएफएस (IL&FS) च्या संदर्भात एक कार्यालयीन ज्ञापन जारी करून कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, युनिअन ऑफ इंडियाला अधिनियम, २०१३ अंतर्गत कारवाई करण्याची विनंती केली. ज्ञापन आणि टिपणीत अधोरेखित केले आहे कीः

(ए) आयएलअँडएफएस (IL&FS) समूह अंदाजे ९१,०००/- कोटी रुपयांच्या कर्जाच्या संसर्गाशी झुंज देत होता. ज्या मध्ये आयएलअँडएफएस (IL&FS) समूहाचे ६,९५०/- कोटी रुपयाचे भागभांडवल आणि किमान १३ पटीने पत राखून ठेवला होता. या शिवाय आयएलअँडएफएस (IL&FS) समूहाने २०१७-१८ या वर्षात २,६७०/- कोटी रुपये तोटा झाल्याचे दर्शविले होते.

(बी) प्रथमदर्शनी, हा कर्जाचा संसर्ग, आयएलअँडएफएस (IL&FS) समूहाच्या निगम नियमन आणि दिखाऊ विपर्यास केलेले खाते (विंडो ड्रेसड अकाउंट) यातील परस्पर कसूर या कारणांमुळे होता; आणि

(सी) पुढील कोणतीही थकबाकी वित्तीय बाजारपेठा आणि अर्थव्यवस्थेच्या कल्याणासाठी विनाशकारी ठरू शकते.

२.१ समांतररित्या, व्यवहार मंत्रालयाने, २०१३ च्या कायद्याच्या कलम २०८ अंतर्गत कंपनी निबंधकाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर, एसएफआयओ (SFIO) ला आयएलअँडएफएस (IL&FS) आणि त्याच्या सहाय्यक कंपन्यांच्या कामकाजाची चौकशी करण्याचे निर्देश दिले.

२.२ दिनांक ०१/१०/२०१८ रोजी कॉर्पोरेट व्यवहार मंत्र्यालयाने राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणा समोर (एनसीएलटी) आयएलऍण्डएफएस (IL&FS) आणि त्याच्या तत्कालीन विद्यमान संचालक मंडळाविरुद्ध कंपनी याचिका क्रमांक ३६३८/२०१८ प्रमाणे याचिका दाखल करून इतर गोष्टीं बरोबरच, आयएलऍण्डएफएस (IL&FS) च्या तत्कालीन विद्यमान संचालक मंडळाला हटवण्याची आणि त्याऐवजी नवीन संचालक मंडळाची नियुक्ती करण्याची मागणी केली गेली. एनसीएलटी (NCLT) ने त्याच तारखेला म्हणजे, दिनांक ०१/१०/२०१८ रोजी अंतरिम आदेश पारित केला, ज्याद्वारे आयएलअँडएफएस (IL&FS) च्या तत्कालीन विद्यमान संचालक मंडळाची जागा नवीन संचालक मंडळाने अधिग्रहित केली. नवीन संचालक मंडळाला आयएलअँडएफएस (IL&FS) च्या कामकाजाची जबाबदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले. आयएलअँडएफएस (IL&FS) च्या नवीन संचालक मंडळाने दिनांक ३०/१०/२०१८ रोजी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडे प्रगती आणि पुढे

जाण्याच्या मार्गाचा अहवाल सादर केला. जो कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने दिनांक ३१/१०/२०१८ रोजी एनसीएलटी (NCLT) कडे सादर केला व जो एनसीएलटी (NCLT) ने पारित केलेल्या दिनांक ०१/१०/२०१८ च्या आदेशास अनुसरून होता .

२.३ दिनांक ३०/०९/२०१८ रोजीच्या तपास सुरु करण्याचे निर्देश देणाऱ्या कार्यालयीन आदेश व इ-मेल दिनांक ०१/११/२०१८ च्या पाठोपाठ एसएफआयओ (SFIO)ने आयएलअँडएफएस (IL&FS) आणि आयएलअँडएफएस (IL&FS) समूहाशी संबंधित कर्मचारी कल्याण विश्वस्त मंडळाच्या संदर्भात अंतरिम अहवाल सादर केला. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की सदर अंतरिम अहवाल कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने "अंतरिम अहवाल" मागवल्यामुळे सादर करण्यात आला होता, जो २०१३ च्या कायद्याच्या कलम २१२(११) च्या अनुषंगाने मागवण्यात आला होता आणि ज्यामध्ये केंद्र सरकारने अंतरिम अहवालाची मागणी करणे आवश्यक होते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की अंतरिम अहवालातच, हे विशेषत: नोंदवले गेले होते की अंतरिम अहवालातील निष्कर्ष हे अंतरिम निष्कर्ष आहेत आणि अंतरिम अहवाल "वरील अंतरिम निष्कर्षांच्या आधारे" असे ठरवून निष्कर्ष काढला आहे. हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की अंतरिम अहवाल आयएलअँडएफएस (IL&FS) समुहाच्या कारभारावर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तींवर आणि त्यांनी केलेली बेकायदेशीरता आणि फसवणुकीबाबत होता.

२.४ अंतरिम अहवालाच्या आधारे, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने आयएलअँडएफएस (IL&FS) समूहातील कंपन्यांच्या पूर्वीच्या संचालकांविरुद्ध कंपनी याचिका क्र. ३६३८/२०१८ मध्ये एक संकीर्ण अर्ज

दाखल केला, ज्याद्वारे त्यांना उक्त कार्यवाहीत सहभागी करून घेण्यासाठी आणि त्यांची स्थावर/जंगम मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देण्याची मागणी केली होती.

२.५ सनदी लेखापाल संस्थेच्या दिनांक ०४/१२/२०१८ च्या अंतरिम अहवालाच्या आणि प्रथमदर्शनी मतांच्या आधारे, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने कंपनी कायदा, २०१८ च्या कलम १३० अन्वये एनसीएलटी (NCLT) कडे याचिका दाखल करून इतर गोष्टींबरोबरच आयएलअँडएफएस (IL&FS), आयएफआयएन (IFIN) आणि आयएल अँड एफएस (IL&FS) ट्रान्सपोर्टेशन नेटवर्क्स लिमिटेड (आयटीएनएल) यांच्या खात्यांची पुस्तके पुन्हा उघडली जाऊन त्यांची पुनर्रचना केली जावी अशी विनंती केली. कलम १३० याचिकेतील दिनांक ०१/०१/२०१९ रोजीच्या पारित केलेल्या आदेशानुसार, एनसीएलटी (NCLT) ने निर्देश जारी केले की आयएलअँडएफएस (IL&FS), आयएफ आयएन (IFIN) आणि आयटीएनएल (ITNL) ची गेल्या ५ वर्षातील आर्थिक खाती ज्यामुळे आयएलअँडएफएस (IL&FS), आयएफआयएन (IFIN) आणि आयटीएनएल (ITNL) च्या कामकाजाचे जे गैरव्यवस्थापन केले गेले आहे आणि वित्तीय विवरणपत्रे/खात्यांच्या विश्वासार्हतेवर शंका निर्माण झाली आहे अशी खाती पुन्हा उघडण्यात यावीत.

२.६ आयएफआयएन (बीएसआर आणि डेलॉयट) (IFIN) (BSR&Deloitte) च्या लेखापरीक्षकांना कलम १३० याचिकेची नोटीस देण्यात आली होती, ज्यांनी या याचिकेला विरोध केला होता. एनसीएलटीने (NCLT) पारित केलेल्या दिनांक ०१/०१/२०१९ रोजीच्या आदेशाला आयएफआयएन

(IFIN) च्या माजी संचालकांपैकी एकाने राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरण, नवी दिल्ली (एनसीएलएटी) समोर आव्हान दिले होते व सदर न्यायाधिकरणाने दिनांक ३१/०१/२०१९ रोजीच्या आदेशाद्वारे सदर अपील फेटाळले. एनसीएलटी (NCLT) ने पारित केलेल्या दिनांक ३१/०१/२०१९ रोजीच्या आदेशाला या न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. माजी संचालकाने दाखल केलेली दिवाणी याचिका, या न्यायालयाने दिनांक ०४/०६/२०१९ रोजीच्या आदेशानुसार फेटाळली. अशा प्रकारे, या न्यायालयाने कंपनी कायदा, २०१८ च्या कलम १३० अंतर्गत कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने सुरू केलेली कार्यवाही कायम ठेवण्यात आली.

२.७ रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) आरबीआय कायदा,१९३४ च्या कलम ४५ एन अंतर्गत आयएलअँडएफएस (IL&FS) आणि आयएफआयएनची (IFIN) तपासणी सुरू केली. तपास/तपासणीनुसार, आरबीआयने आयएफआयएन(IFIN) ला दिनांक २२/०३/२०१९ रोजीचा तपास/तपासणी अहवाल सादर केला. त्यानंतर दिनांक १३/०५/२०१९ रोजी आयएफआयएन (IFIN) ने कायदा, २०१३ च्या कलम १४०(१) अंतर्गत इतर गोष्टींबरोबरच बीएसआर (BSR) ला लेखापरीक्षक पदावरून हटवण्याची मागणी करणारी नोटीस जारी केली. बीएसआर (BSR) ने कायदा, २०१३ च्या कलम १४० (१) अंतर्गत आयएफआयएन (IFIN) ने दिलेल्या नोटीसला लेखी उत्तर दाखल केले आणि त्याद्वारे सदर नोटीसमधील आरोप नाकारले. आयएफआयएन (IFIN) ने दिनांक २९/०५/२०१९ रोजी सुनावणी आयोजित केली होती, ज्यात बीएसआर (BSR) ने सादरीकरण देखील केले होते/उपस्थित होते.

२.८ दिनांक ३०/०१/२०१८ च्या कार्यालयीन आदेशानुसार एसएफआयओ (SFIO) ने आयएलअँडएफएस (IL&FS) फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचा (एसएफआयओ अहवाल) तपास अहवाल सादर केला.

२.९ कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने दिनांक २९/०५/२०१९ च्या पत्राद्वारे प्रादेशिक संचालक (पश्चिम क्षेत्र) आणि एसएफआयओ (SFIO) यांना कारवाई/खटला सुरू करण्याची विनंती केली. एसएफआयओ (SFIO) ला कंपनी कायद्याच्या कलम ४४७ आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ४१७, ४२० आणि १२० बी इतर तरतुदी अंतर्गत कारवाई/खटला सुरू करण्यास सांगण्यात आले होते. प्रादेशिक संचालकांना कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) अंतर्गत याचिका दाखल करण्यास सांगण्यात आले होते.

२.१० त्यानंतर दिनांक ३०/०५/२०१९ रोजी, एसएफआयओ (SFIO) ने सत्र न्यायालय (विशेष न्यायाधीश-कंपनी कायदा), मुंबई यांच्या समक्ष सीसी क्र. २०/२०१९ प्रमाणे आयएफआयएन (IFIN) चे लेखापरीक्षक/माजी लेखापरीक्षक यांच्या विरोधात फौजदारी तक्रार दाखल केली.

२.११ त्यानंतर कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने दिनांक १०/०६/२०१९, आयएफआयएन (IFIN) च्या बीएसआर (BSR) आणि डेलॉयट या लेखापरीक्षकांविरुद्ध आणि संलग्न भागीदार तसेच त्यांच्या चमू विरुद्ध इतर गोष्टींबरोबर २०१३ च्या कायद्याच्या कलम १४० (५) अंतर्गत याचिका दाखल केली. कलम १४०(५) अंतर्गत दाखल केलेल्या याचिकेत, इतर गोष्टींबरोबरच बीएसआरला (BSR); आयएफआयएन (IFIN) चे लेखापरीक्षक म्हणून काढून टाकण्याची विनंती करण्यात आली होती. तसेच डेलॉईटला

आयएलअँडएफएस ( IL&FS ) साठी आर्थिक वर्ष २०१२-१३ ते २०१७-१८ साठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून काढून टाकण्यात यावे असे घोषित करण्याकरिता आर्थिक वर्ष २०१२- १३ ते आर्थिक वर्ष २०१७-१८ कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाला कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) च्या पहिल्या तरतुदीनुसार आयएफआयएन साठी लेखापरीक्षक नियुक्त करण्याची परवानगी द्या; आणि बीएसआर (BSR) व त्याचे संलग्न भागीदार, डेलॉयट आणि त्याचे संलग्न भागीदार, हे कायदा २०१३ च्या कलम १४० (५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीसाठी लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र राहणार नाहीत अशी घोषणा/निर्देश देण्याची मागणी केली .

२.१२ बीएसआर (BSR) ने दिनांक १९/०६/२०१९ रोजी आयएफआयएनला (IFIN) राजीनाम्याचे पत्र जारी केले आणि त्याबरोबरच अशा राजीनाम्याच्या अनुषंगाने नियामक बाबी पूर्ण केल्या.

२.१३ बीएसआर (BSR) आणि त्याच्या संलग्न भागीदारांनी एनसीएलटी (NCLT) कडे कलम १४०(५) च्या याचिकेवर दिनांक १९/०६/२०१९ रोजी उत्तर दाखल केले, ज्यामध्ये असा युक्तिवाद करण्यात आला की (i) त्यांनी राजीनामा दिल्यामुळे ते आयएफआयएन (IFIN) चे लेखापरीक्षक नाहीत आणि त्यामुळे कलम १४०(५) त्यांना लागू होत नाही; आणि (ii) कलम १४०(५) बीएसआर (BSR) विरुद्ध फसवणुकीचे कोणतेही प्रकरण दर्शवत नाही.

२.१४ डेलॉईट आता आयएफआयएन (IFIN) साठी लेखापरीक्षक नाही या आधारावर डेलॉईटने एनसीएलटी (NCLT) कडे कलम १४०(५) याचिकेच्या समर्थनीयतेला आव्हान देत दिनांक १९/०६/२०१९ रोजी अर्ज दाखल केला. बीएसआर (BSR) आता आयएफआयएन (IFIN) साठी लेखापरीक्षक नाही या आधारावर बीएसआर (BSR) आणि त्याच्या संलग्न भागीदारांनी देखील एनसीएलटी (NCLT) कडे कलम १४० (५) समर्थनीयतेच्या याचिकेला आव्हान देणारा अर्ज दाखल केला.

२.१५ कलम १४०(५) याचिकेच्या समर्थनीयतेला आव्हान देणाऱ्या अर्जांवर लेखापरीक्षक (बीएसआर आणि डेलॉयट) यांचे म्हणणे ऐकल्यानंतर, एनसीएलटी (NCLT) ने कलम १४० (५) याचिकेची समर्थनीयता कायम ठेवण्याचा आदेश दिला. त्यानंतर, बीएसआर (BSR) ने उच्च न्यायालयात कायदा, २०१३ च्या कलम १४० (५) च्या नियमांनाना आणि कलम १४० (५) याचिकेची कायमस्वरूपीतता कायम ठेवणाऱ्या एनसीएलटी (NCLT) च्या आदेशाला आव्हान देणारी रिट याचिका दाखल केली.

२.१६ आक्षेपीत निर्णय आणि आदेशाद्वारे, जरी उच्च न्यायालयाने कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) ची वैधता कायम ठेवली असली, तरी उच्च न्यायालयाने कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) चा अर्थ लावला आहे आणि कलम १४०(५) याचिकेची कायमस्वरूपीता कायम ठेवत एनसीएलटी (NCLT) ने दिलेला आदेश रद्द केला आहे आणि कलम १४०(५) याचिका रद्द केली आहे आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि एसएफआयओ (SFIO) ने जारी केलेले निर्देश रद्द बातल केले आहेत आणि एसएफआयओ (SFIO)

ने सुरू केलेली फौजदारी कार्यवाही देखील रद्द बातल केली आहे. त्यास्तव या प्रस्तुत याचिका.

**<u>युनिअन ऑफ इंडियाच्या वतीने सादर करण्यात आलेले निवेदन -</u>**

३. भारत सरकारच्या वतीने बाजू मांडणारे भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री.बलबीर सिंग यांनी ठामपणे सांगितले आहे की जरी उच्च न्यायालयाने या तरतुदीची घटनात्मकता कायम राखली असली तरी आक्षेपीत निकाल आणि आदेशात उच्च न्यायालयाने २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) चा चुकीचा अर्थ लावला आहे.

३.१ २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) च्या व्याख्येबाबत उच्च न्यायालयाने, फसवणूक झाल्याचा संशय असलेल्या कंपनीतील लेखापरीक्षकाला बदलण्यास प्रवृत्त करणे/प्रभावित करणे हा कायदेशीर हेतू असल्याचे स्पष्ट केले आहे. असे सादर करण्यात आले आहे की कायदा २०१३ च्या कलम १४०(५) मागचा हेतू केवळ लेखापरीक्षक आणि कंपनी यांच्यातील संगनमत मोडून काढण्याचा आहे, असे उच्च न्यायालयाने चुकीचे मत मांडले आहे. असे सादर करण्यात आले आहे की त्यानुसार, उच्च न्यायालयाने चुकून असे म्हटले आहे की जर लेखापरीक्षक आणि कंपनी यांच्यातील अपवित्र बंध एकतर काढून टाकले किंवा राजीनामा देऊन तोडले गेले तर कायदा २०१३ च्या कलम १४०(५) सदर उद्देश पूर्ण करतो. असे सादर केले आहे की उच्च न्यायालयानुसार, कायद्याच्या कलम १४०(५) केवळ तेव्हाच आकर्षित होते जेव्हा केंद्र सरकारने याचिका दाखल करूनही लेखापरीक्षक बचावपक्ष स्थापन करतो आणि याचिकेला क्षुल्लक विरोध करतो आणि अशा प्रकारे कायदा

२०१३ च्या कलम १४० (५) च्या दुसऱ्या तरतुदीत नमूद केल्याप्रमाणे अंतिम आदेश मागवतो. असे सादर केले आहे की या आधारावर, उच्च न्यायालयाने असे मत मांडले की कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) अंतर्गत भारत सरकारने दाखल केलेली याचिका लेखापरीक्षकाच्या त्यानंतरच्या राजीनाम्यामुळे समाधानकारक ठरली आहे आणि म्हणूनच भारत सरकारने कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) अंतर्गत दाखल केलेली याचिका यापुढे समर्थनीय नाही. उच्च न्यायालयाने कलम १४०(५) याचिका आणि एनसीएलटी (NCLT), मुंबईने त्याची कायमस्वरूपीता कायम ठेवत दिलेला आदेश रद्द करण्यासाठी चुकून पावले उचलली, असे सादर केले आहे.

३.२ आता फौजदारी कार्यवाही रद्द बातल करणे या संदर्भात असे सादर केले जाते की प्रतिवादींनी कलम २१२ (१४) च्या निर्देशांवर दोन कारणानी आक्रमण केले. प्रथम, आयएफआयएन (IFIN) एसएफआयओ (SFIO) अहवाल मिळाल्यानंतर ३० तासांच्या आत खटला चालवण्याचे निर्देश जारी करणे हे बुद्धीचा वापर न करणे हे दर्शवते. दुसरे म्हणजे, आयएफआयएन (IFIN) एसएफआयओ (SFIO) अहवाल हा अपूर्ण होता कारण तपास पूर्ण झालेला नव्हता आणि त्यामुळे कलम २१२ (१४) चे निर्देश निष्क्रिय होते. असे सादर करण्यात आले आहे की पहिल्या कारणापर्यंत, उच्च न्यायालयाने चुकीचे मत मांडले आहे की बुद्धीचा वापर केला नाही कारण सुमारे ७५० पृष्ठे आणि ३२००० पृष्ठांच्या अहवालांचे परिशिष्टांचा ३० तासांत विचारात घेतला जाणे हे असंभव आहे. पुढे, उच्च न्यायालयाने चुकून असे म्हटले आहे की बुद्धीचा वापर दर्शविण्यासाठी संबंधित तथ्ये आणि कागदपत्रे नोंदवली गेली नाहीत. असे सादर करण्यात आले आहे की उच्च न्यायालयाने असेही म्हटले

आहे की वैध मंजुरीच्या अस्तित्वाचे रिट न्यायालयात कौतुक केले जाऊ शकते आणि खटल्याची प्रतीक्षा करण्याची आवश्यकता नाही.

३.३ आयएफआयएन (IFIN) एसएफआयओ (SFIO) अहवालाच्या संदर्भात, असे सादर केले आहे की उच्च न्यायालय थोडक्यात आणि अगदी त्यात न जाता आणि चुकीचे मत मांडले आहे की एसएफआयओ (SFIO) अहवाल अपूर्ण असून त्यात अभाव आहे आणि म्हणून कलम २१२ (१४) चा निर्देश चुकीचा आणि/किंवा अवैध आहे.

३.४ कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) चा अर्थउकल करण्याकरिता, विद्वान एएसजी श्री. बलबीरसिंग यांनी आमचे लक्ष २०१३ च्या कायदा च्या कलम १४० (५) च्या विधिमंडळाच्या इतिहासाकडे आणि विधिमंडळाच्या हेतूकडे नेले. असे सादर करण्यात आले आहे की कायदा २०१३ च्या कलम १४० चे शीर्षक 'लेखापरीक्षकाची हकालपट्टी, राजीनामा आणि विशेष नोटीस देणे' असे आहे आणि हे कायद्याच्या X व्या प्रकरणात ज्याचे शीर्षक 'लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षक' असे आहे त्यामध्ये आढळून येते. कायदा, २०१३ च्या कलम १४० (१) मध्ये कंपनीकडून लेखापरीक्षकाला त्याची मुदत संपण्यापूर्वी काढून टाकण्याच्या प्रक्रियेची तरतूद दिली आहे. कायद्याचे कलम १४०(२) आणि (३) लेखापरीक्षकांच्या राजीनाम्याशी संबंधित आहेत आणि कायद्याचे कलम १४० (४) सेवानिवृत्त लेखापरीक्षकाव्यतिरिक्त लेखापरीक्षकाच्या नियुक्तीसाठी एजीएम (AGM) मध्ये विशेष नोटीस देणे आणि त्या संदर्भात प्रसंभाविक प्रक्रिया करण्याशी संबंधित आहे. असे सादर करण्यात आले आहे की जर एखाद्या कंपनीचा लेखापरीक्षक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम करत असेल किंवा कंपनीच्या कर्मचारी

व्यवस्थापनास फसवणूक करण्यास प्रवृत्त करत असेल किंवा संगनमत करत असेल तर कायदा, २०१३ चे कलम १४० (५) एकतर केंद्र सरकार किंवा संबंधित कोणत्याही व्यक्तीला एनसीएलटी (NCLT) कडे सहारा घेण्याकरीता जाण्याचा अधिकार देतो. कायद्याचे कलम १४०(५) एनसीएलटी (NCLT) ला उपरोक्त पद्धतीने काम करणाऱ्या लेखापरीक्षकाच्या विरोधात स्वतःहून कारवाई करण्यास समर्थन देतो. याव्यतिरिक्त, २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) मध्ये देखील दोन तरतुदी आणि दोन स्पष्टीकरणे आहेत. त्यामुळे कलम १४०(५) च्या पहिल्या परंतुका नुसार, जर केंद्र सरकारने अर्जावर असे सादर केले असेल की लेखापरीक्षकाबाबत कोणताही बदल आवश्यक आहे आणि जर न्यायाधिकरणाचे तसे समाधान झाले असेल तर असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत न्यायाधिकरण आदेश देईल की सदर लेखापरीक्षक हा लेखापरीक्षक म्हणून काम करणार नाही आणि केंद्र सरकार त्याच्या जागी दुसऱ्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करू शकेल. असे सादर करण्यात आले आहे की कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या परंतुकात अशी तरतूद आहे की, ज्या लेखापरीक्षकाच्या विरोधात न्यायाधिकरणाने कलम १४०(५) अंतर्गत अंतिम आदेश दिला असेल, तो लेखापरीक्षक, मग तो व्यक्ती असो किंवा कंपनी, तो आदेश पारित झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र राहणार नाही आणि लेखापरीक्षक देखील कलम ४४७ अंतर्गत कारवाईस पात्र असेल. असे सादर करण्यात आले आहे की कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही प्रलंबित असताना लेखापरीक्षकाने केवळ राजीनामा दिल्यामुळे, कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही संपुष्टात येत नाही. तरीही आणि अंतिम आदेश पारित झाल्यानंतर, अशा परिस्थितीत, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार पुढील आदेश

पारित केला जाऊ शकतो, ज्यामुळे अशा लेखापरीक्षकाची आदेश पारित झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यास अपात्र ठरविले जाऊ शकते आणि असा लेखापरीक्षक देखील कंपनी कायद्याच्या कलम ४४७ अंतर्गत कारवाईसाठी जबाबदार असेल. त्यामुळे, एकदा लेखापरीक्षकाने राजीनामा दिल्यानंतर कायद्याच्या कलम १४०(५) अन्वये केलेला अर्ज कायम राखण्यायोग्य राहणार नाही आणि/किंवा त्यावर पुढे कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही, असे निरीक्षण आणि निर्णय देताना उच्च न्यायालयाने भौतिक चूक केली आहे, असे सादर केले आहे.

३.५ त्यानंतर, विद्वान एएसजी (ASG) श्री. बलबीर सिंग यांनी आम्हाला कायद्याच्या कलम १४०(५) च्या विधिमंडळाच्या इतिहासाचा संदर्भ खालीलप्रमाणे दिलाः

## कायदा २०१३ च्या कलम १४० (५) विधिमंडळचा इतिहास

ऑगस्ट २००४ च्या सुमारास सरकारने कंपनी कायदा, १९५६ चा पुनरावलोकन करण्याची आणि कंपनी कायदा १९५६ च्या जागी नवीन कंपनी विधेयकाचा मसुदा तयार करण्याची प्रसंभाविक प्रक्रिया सुरू केली. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या संकेतस्थळावर एक संकल्पना लेख प्रकाशित करण्यात आला होता, ज्यावर विविध टिप्पण्या प्राप्त झाल्या होत्या. कंपनी कायद्यातील तरतुदींबाबत शिफारस करण्यासाठी डॉ. जे. जे. इराणी यांच्या अध्यक्षतेखाली कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने एक तज्ज्ञ समितीही स्थापन केली होती.

ए). कंपनी विधेयक २००८ आणि द कंपनी विधेयक २००९

i. जे. जे. इराणी समितीचा अहवाल विचारात घेऊन मंत्रालयाने कंपनी विधेयक २००८ तयार केले आणि ते २३ ऑक्टोबर २००८ रोजी लोकसभेत मांडण्यात आले होते. २००८ चे विधेयक त्यांच्या तपासणीसाठी वित्त विभागाशी संबंधित संसदीय स्थायी समितीकडे (पार्लियामेंट्री स्टँडिंग समिती) पाठवण्यात आले होते. तथापि, पीएससी (PSC) ने आपला अहवाल सादर करण्यापूर्वीच लोकसभा विसर्जित करण्यात आली आणि त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या कलम १०७(५) नुसार २००८ चे विधेयक रद्द झाले.

ii. त्यानुसार, कंपनी विधेयक २००९ हे १५ जुलै २००९ रोजी किंवा त्या दरम्यान लोकसभेत मांडण्यात आले.२००९ चे विधेयकही पीएससी (PSC) कडे पाठवण्यात आले होते. २००९ च्या विधेयकाची वैशिष्ट्ये ओळखताना ऑगस्ट २०१० च्या पीएससी अहवालात ठळक वैशिष्ट्ये नमूद केली आहेत की "लेखापरीक्षकांची भूमिका, अधिकार आणि कर्तव्ये परिभाषित केली गेली आहेत जेणेकरून एकात्मता प्रसंभाविक प्रक्रिया आणि लेखापरीक्षण प्रक्रियेचे" स्वातंत्र्य राखले जाऊ शकेल.

iii. २००९ च्या विधेयकात अंतर्भूत असलेली मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करताना, पीएससी ने अहवालात नमूद केले आहे की इतर तत्त्वांबरोबरच २००९ च्या विधेयकात अंतर्भूत असलेली प्रमुख तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत –

"मजबूत प्रणाली, वाढीव पारदर्शकता आणि सर्वसमावेशक प्रकटीकरण आधारित व्यवस्थेच्या गरजेवर भर देण्यात आला; कंपन्या

जसजशा वाढतात, तसतश्या मोठ्या होतात आणि भागधारकांची संख्या आणि व्याप्ती प्रमाणानुसार वाढत जाते, ज्यामुळे योग्य नियंत्रण आणि संतुलन आवश्यक आहे.

अंतर्गत यंत्रणा/कार्यपद्धतींद्वारे स्वनियंत्रण, मजबूत प्रणाली आणि कार्यपद्धतींवर आधारीत असेल; जेव्हा गैर-प्रशासन घडेल तेव्हाच केंद्र सरकार हस्तक्षेप करेल.

कॉर्पोरेट गैर-प्रशासनातील अलीकडील अनुभवांच्या आधारावर लेखापरीक्षणाची प्रक्रिया आणि लेखापरीक्षकांचे कार्य अधिक स्वतंत्र आणि प्रभावी बनवणे; विहित संयुक्त आणि वयक्तिक दायित्व कठोर करणे; मानके निश्चित करण्यासाठी आणि लेखापरीक्षणाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्यासाठी देखरेख मंडळाची स्थापना करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

iv. पुढे, अहवालात नमूद केले आहे की केंद्र सरकारने समाविष्ट केलेल्या या विधेयकावरील चर्चेदरम्यान पीएससी (PSC) ने विविध प्रस्ताव दिले होते. सदर प्रस्ताव वाचल्यावर हे लक्षात घेणे आवश्यक आहे की लेखा परीक्षकांचे स्वातंत्र्य हा एक महत्त्वाचा मुद्दा होता.

v. महत्त्वाचे म्हणजे, अहवालात, पीएससी (PSC) ने नमूद केले आहे की २००९ च्या विधेयकात १९९३ च्या बँकिंग आणि रोखे बाजार घोटाळ्यावर आणि २००२ च्या शेअर बाजार घोटाळ्यावर जेपीसी (JPC) च्या सूचनांचा समावेश आहे. याचा अर्थ असा आहे की २००९ चे विधेयक सुद्धा हे वाढत्या कॉर्पोरेट अर्थव्यवस्थेची आणि कॉर्पोरेट उद्योगांच्या मागील अनुभवांची

पराकाष्ठा होती. लेखापरीक्षकांसाठी अधिक कठोर जबाबदारीची तरतूद करणे हा एक प्रस्ताव होता. शिवाय, त्याच पानाच्या तळाशी, पीएससी (PSC) ने असे नोंदवले आहे की २००९ च्या विधेयकाने लेखापरीक्षकांना लक्षणीय दिवाणी आणि फौजदारी उत्तरदायित्व प्रदान करून वैधानिक लेखा परीक्षकांना अधिक उत्तरदायी बनविण्याची तरतूद करून नियामक तरतुदी आणि नियम अधिक कठोर केले आहेत.

vi. लेखापरीक्षकांची भूमिका, जबाबदारी, कर्तव्ये आणि नियमन आणि नियामक आणि अंमलबजावणीच्या तरतुदींवर दीर्घ चर्चा झाली असे अहवाल स्पष्टपणे दर्शवितो. विशेषतः, लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षकांशी संबंधित तरतुदी अधिक कठोर करण्यासाठी विविध सूचना प्राप्त झाल्याचे अहवालात नोंदवले आहे. लक्षणीय बाब म्हणजे, २००९ च्या विधेयकाच्या खंड १२३(१०) मध्ये [एनसीएलटी (NCLT) ला ज्यात फसवणूक झाल्याचे आणि कायद्याच्या कलम १४०(५) शी संबंधित असल्याचे आढळून आल्यानंतर लेखापरीक्षकाला हटवण्याची तरतूद आहे] अधिक कठोर केले जावे आणि न्यायाधिकरणाने काढून टाकलेला लेखापरीक्षक ५ वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र नसावा, असा विचार केला जावा, अशी सूचना प्रस्तावित करण्यात आली होती. संबंधित उतारे खालीलप्रमाणे आहेतः

"३४. लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षकांशी संबंधित तरतुदी अधिक कडक करण्याची गरज आहे अशा सूचना समितीला प्राप्त झाल्या आहेत, जसे कीः -

(ड) या तरतुदींचे उल्लंघन केल्यास योग्य दंडाची तरतूद केली जाऊ शकते.

(ई) (i) विधेयकाचा खंड १२३(१०) न्यायाधिकरणाला, कंपनीच्या लेखापरीक्षकाने फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कोणत्याही फसवणुकीस प्रवृत्त/संगनमत केले आहे असे समाधान झाल्यास, कंपनीला त्याचे लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देण्याचे अधिकार प्रदान करतो. या तरतुदींमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे लेखापरीक्षकाच्या फसवणुकीच्या किंवा प्रोत्साहन देण्याच्या कृतीचा समावेश करण्यासाठी स्पष्टीकरण देण्यासाठी सुधारणा करण्यात याव्यात असे प्रस्तावित करण्यात आले आहे. असेही प्रस्तावित करण्यात आले आहे की, ज्या लेखापरीक्षकाच्या विरोधात न्यायाधिकरणाने या खंडांतर्गत आदेश दिला आहे, तो व्यक्ती असो किंवा संस्था त्यास पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र नसावा, अशी तरतूद या विधेयकात केली जाऊ शकते.”

## बी) <u>द कंपनी विधेयक, २०११</u>

i. स्थायी समिती आणि विविध भागधारकांच्या शिफारशी लक्षात घेऊन, केंद्र सरकारने स्थायी समिती आणि विविध भागधारकांच्या शिफारशींचा समावेश असलेले नवीन विधेयक सादर करण्याच्या दृष्टीने २००९ चे विधेयक मागे घेतले. परिणामी, २०११ चे विधेयक डिसेंबर २०११ मध्ये लोकसभेत मांडण्यात आले, ज्यात कंपनी विधेयक २००९ च्या संदर्भात आधीच्या स्थायी समितीने केलेल्या बहुतेक शिफारशी स्वीकारण्यात आल्या

होत्या आणि त्यांचा समावेश करण्यात आला होता. हा पैलू कंपनी विधेयक, २०११ च्या उद्दिष्टांची विधाने आणि कारणांमध्ये नोंदविण्यात आला आहे.

ii. या टप्प्यावर, २००९ च्या विधेयकाच्या खंड १२३ (१०) च्या स्थायी समितीचे प्रस्ताव (ज्यामध्ये फसवणूक झाल्याचे आढळून आल्यानंतर एनसीएलटी (NCLT) द्वारे लेखापरीक्षकाला हटवण्याची तरतूद आहे) हे मध्यंतरी स्वीकार करणे महत्त्वाचे आहे कारण की --

- तरतूद अधिक कडक करणे आणि
- जेव्हा असा लेखापरीक्षक फसवणूक करत असल्याचे आढळून येते आणि अशा फसवणुकीसाठी त्याला एनसीएलटी (NCLT) द्वारे काढून टाकले जाते, तेव्हा लेखापरीक्षकासाठी परिणामांची तरतूद करणे.

iii. २००१ च्या विधेयकात लेखापरीक्षकांच्या हकालपट्टीशी संबंधित तरतुदी २०११ च्या विधेयकाच्या खंड १४० मध्ये एकत्रित केल्या आहेत. पुढे, २०११ च्या विधेयकात (२००९ च्या विधेयकाप्रमाणेच) खंड १४० (५) मध्ये लेखापरीक्षकाने फसवणूक केल्याचे आढळून आल्यानंतर लेखापरीक्षकाला काढून टाकण्याचा एनसीएलटी (NCLT) चा अधिकार २०११ च्या विधेयकाप्रमाणे कायम आहे. अत्यंत प्रासंगिकपणे, अहवालात समाविष्ट असलेल्या स्थायी समितीच्या शिफारशींचा समावेश असलेले २०११ चे विधेयक, ज्यात लेखा परीक्षकाने फसवणूक केल्याचे एनसीएलटी (NCLT) द्वारे असे आढळून येणे आणि एनसीएलटी (NCLT) द्वारे अशा फसवणुकीसाठी काढून टाकणे आणि लेखापरीक्षकांसाठी परिणामांची तरतूद

करणे हे विधेयकाच्या खंड १४०(५) च्या तरतुदीद्वारे (विशेषतः दुसरी तरतुद) समाविष्ट केले गेले आहे. २०११ च्या विधेयकाच्या खंड १४०(५) चा संबंधित उतारा खालीलप्रमाणे आहेः

"(५) या कायद्याच्या किंवा सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखालील कोणत्याही कारवाईवर पूर्वग्रह न बाळगता, न्यायाधिकरण एकतर स्वतःहून किंवा केंद्र सरकारने किंवा संबंधीत कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अर्जावर, कंपनीच्या लेखापरीक्षकाने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसवणुकीच्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधात कोणत्याही फसवणुकीस प्रवृत्त केले आहे किंवा संगनमत केले आहे असे समाधान झाल्यास, ते आदेशाद्वारे कंपनीला त्याचे लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देऊ शकतात.

परंतु, जर केंद्र सरकारने अर्ज केला असेल आणि लेखापरीक्षकाचा कोणताही बदल आवश्यक आहे असे न्यायाधिकरणाचे समाधान झाले असेल, तर असा अर्ज मिळाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत तो लेखापरीक्षक म्हणून काम करणार नाही असा आदेश देईल आणि केंद्र सरकार त्याच्या जागी दुसऱ्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करू शकेलः

परंतु पुढे असे सांगितले गेले आहे की, ज्या लेखापरीक्षकाच्या विरोधात न्यायाधिकरणाने या कलमांतर्गत अंतिम आदेश दिला आहे, तो व्यक्ती असो वा संस्था, तो आदेश पारित झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र राहणार नाही आणि लेखापरीक्षक देखील कलम ४४७ अंतर्गत कारवाईसाठी जबाबदार असेल.

स्पष्टीकरण - या प्रकरणाच्या उद्देशांसाठी 'लेखापरीक्षक' या शब्दाचा समावेश "लेखापरीक्षकांच्या एका संस्थेशी" आहे.

iv. त्यानंतर, जानेवारी सन २०१२ मध्ये, २०११ चे विधेयक लोकसभेने स्थायी समितीसमोर ठेवले.स्थायी समितीने या संदर्भात आपला अहवाल तयार केला आणि त्याला अंतिम रूप दिले आणि कलम १४० (५) च्या दंड आणि मार्गदर्शक तत्त्वांचा विचार करता, या संदर्भात पुढील कायदेमंडळाच्या हेतूबद्दल कोणतेही मार्गदर्शन नाही.

v. वरील बाबी लक्षात घेता, २०११ च्या विधेयकाच्या कलम १४० (५) ची चाचणी अपरिवर्तित राहिली आहे, ती कंपनी कायदा, २०१३ च्या सध्याच्या कलम १४०(५) प्रमाणेच लागू करण्यात आली आहे.

३.६ असे सादर करण्यात आले आहे की, त्यानंतर कंपनी विधेयक, २००९ च्या माध्यमातून हा कायदा पहिल्यांदा सादर करण्यात आला, ज्यात कायद्याच्या कलम १४३ (१२) नुसार आढळलेल्या कोणत्याही फसवणुकीची तक्रार केंद्र सरकारकडे करण्याचे लेखापरीक्षकावर बंधन समाविष्ट करण्यात आले आणि ज्या लेखापरीक्षकाने ५ वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीत फसवणूक केल्याचे किंवा लेखापरीक्षक म्हणून संगनमत केल्याचे आढळून आले आहे असे कायद्याच्या कलम १४० (५) च्या दुसऱ्या तरतुदीच्या स्वरूपात समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे कायद्याच्या कलम १४० (५) मागचे सार्वजनिक धोरण अगदी स्पष्ट आहे की एका कंपनीत फसवणूक किंवा संगनमत केल्याचे आढळून आलेल्या लेखापरीक्षकाला ५ वर्षांच्या कालावधीसाठी कोणतेही वैधानिक लेखापरीक्षण करण्यापासून रोखणे. **देवास मल्टीमीडिया प्रायव्हेट लिमिटेड - विरुद्ध - अँट्रिक्स कॉर्पोरेशन लिमिटेड आणि**

**इतर (२०२३) १ एससीसी २१६** मध्ये नोंदविलेल्या या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयावर विश्वास ठेवण्यात आला आहे.

३.७ विद्वान एएसजी (ASG) श्री. बलबीर सिंग यांनी पुढे नमूद केले आहे की कलम १४० (५) हे कायद्याच्या प्रकरण X मधे समाविष्ट आहे. पुढे असे सादर केले आहे की प्रकरण X मध्ये समाविष्ट असलेले कलम १४० (५) विशेषतः 'लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षक' याच्याशी संबंधित आहे. कायद्याचे कलम १४३ लेखापरीक्षकांचे अधिकार आणि कर्तव्ये यांच्याशी संबंधित आहे. कलम १४३ च्या उपकलम (१२) मध्ये विशेषतः अशी तरतूद आहे की, कंपनीमध्ये फसवणुकीचा गुन्हा होत आहे किंवा केला गेला आहे असे लेखापरीक्षकांना वाटत असल्यास, लेखापरीक्षक केंद्र सरकारला या प्रकरणाचा अहवाल सादर करेल. या संदर्भात जारी केलेल्या नियमांनुसार तपशीलवार प्रक्रिया प्रदान केली आहे.

३.८ पुढे असे सादर केले आहे की कायद्याच्या कलम १४४ मध्ये अशी तरतूद आहे की लेखापरीक्षक निश्चित अश्या काही सेवा देऊ शकत नाही आणि सध्याच्या प्रकरणाशी संबंधित सेवा म्हणजे "व्यवस्थापन सेवा". लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण सेवांच्या व्याप्तीबाहेरील त्याच्या कोणत्याही कृती मुळे प्रभावित न झालेली एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून काम करावे हा उद्देश आहे, असे सादर केले आहे. लेखापरीक्षकाला कोणत्याही प्रकारचे व्यवस्थापन सेवा देण्यास कंपनीला मनाई आहे. हे सादर केले आहे की कायद्याच्या कलम १४४ अंतर्गत तयार करण्यात आलेले निर्बंध आणि प्रतिबंध प्रामुख्याने कंपनी, कर्जदार आणि गुंतवणूकदार आणि मोठ्या प्रमाणात जनतेसारख्या इतर भागधारकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आहेत.

३.९ या तरतुदी आणि अंतर्निहित सार्वजनिक धोरणाची पार्श्वभूमी ठेवून, २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) चा विचार केला जावा, असे सांगितले आहे. हे सादर केले आहे की कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) च्या सरळ शब्दांमध्ये एनसीएलटी (NCLT) ला एकतर स्वतःहून किंवा केंद्र सरकार/संबंधित कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अर्जावर, लेखापरीक्षकाच्या वर्तनाची किंवा त्याच्या फसवणुकीत सहभागाची चौकशी/तपासणी करण्याची आणि लेखापरीक्षकाच्या फसव्या वर्तनाबाबत समाधानाची माहिती पुरवण्याची तरतूद आहे. या तरतुदीत पुढे असे नमूद केले आहे की, माननीय एनसीएलटी (NCLT) च्या समाधानावरून शेवटी लेखापरीक्षक बदलू शकतो.

३.१० हे सादर केले जाते की कायद्याच्या कलम १४०(५) च्या पहिल्या तरतुदी जेव्हा फसवणूक झाली आहे आणि परिस्थिती ते बदलण्याची हमी देते तेव्हा विद्यमान लेखापरीक्षकाला कायम ठेवण्यापासून रोखण्यासाठी आणि त्याच्या जागी केंद्र सरकारने नामनिर्देशित केलेल्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यासाठी, अशा प्रथमदर्शनी समाधानाच्या आधारे अंतरिम किंवा मुदतपूर्व उपाय म्हणून विचार केला जातो. हा एक अंतरिम आदेश आहे आणि तो तात्पुरत्या निलंबनाप्रमाणेच काम करतो.

३.११ असे सादर केले जाते की कायद्याच्या कलम १४०(५) ची दुसरी तरतूद जी ठोस तरतुदीच्या स्वरूपाची आहे, ती लेखापरीक्षकाच्या फसव्या किंवा संगनमतपूर्ण वर्तनाबद्दल आणि परिणामी त्याला कंपनीतून काढून टाकल्याबद्दलचे समाधान माननीय एनसीएलटी (NCLT) ने नोंदविलेल्या

आदेशावर सक्रिय होते आणि त्याला ५ वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीत लेखापरीक्षक होण्यापासून प्रतिबंधित करते. पहिल्या तरतुदीमध्ये दिलेला आदेश हा कायद्याच्या कलम १४० (५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत विचारात घेतलेला आदेश नाही. अशा प्रकारे, जर एनसीएलटी (NCLT) ला फसवे वर्तन किंवा फसवणुकीत संगनमत झाले आहे असे मानण्याचे कोणतेही कारण शेवटी आढळले नाही, तर पहिल्या तरतुदीनुसार आदेशानुसार तात्पुरते निलंबित केलेले लेखापरीक्षक पुन्हा नियुक्त केले जाऊ शकतात.

३.१२ असे सादर केले जाते की कायद्याचे कलम १४०(५) हे माननीय एनसीएलटी (NCLT) ला लेखापरीक्षकाच्या वर्तनावर अभिनिर्णय घेण्याचे किंवा चौकशी करण्याचे आणि लेखापरीक्षकाने फसव्या पद्धतीने काम केले आहे की नाही हे ठरवण्याचे अधिकार प्रदान करते. या कलमांतर्गत आवश्यक असलेल्या चौकशीचे स्वरूप अनिवार्य करणाऱ्या तरतुदीच्या कार्यान्वित भागातून हे स्पष्ट होते. हे "प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसव्या पद्धतीने केले जाते किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंध कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले जाते किंवा संगनमत केले जाते".

३.१३ त्यामुळे, कोणत्याही अंतिम आदेशात निश्चितपणे 'फसवणूक' किंवा 'फसव्या वर्तनाचे' सकारात्मक किंवा नकारात्मक निर्धारण असेल, असे सादर केले आहे. परिणामस्वरूप कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत फसवणूक शोधण्याबाबत हि तरतूद स्पष्ट करते की फसवणूक/फसव्या वर्तनाच्या निष्कर्षामुळे लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देणारा आदेश होऊ "शकतो".

दुसऱ्या तरतुदीत पुढे स्पष्टपणे तरतूद करण्यात आली आहे की ज्या लेखापरीक्षकाच्या "विरोधात अंतिम आदेश देण्यात आला आहे", तो लेखापरीक्षक ५ वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून काम करण्यास अपात्र आहे. लक्षणीय बाब म्हणजे, कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीत वापरलेले शब्द 'अंतिम आदेश' आहेत आणि 'अशा प्रकारे काढून टाकलेला लेखापरीक्षक' किंवा 'बदललेला लेखापरीक्षक' नाहीत.

३.१४ असे सादर करण्यात आले आहे की त्यामुळे कंपनीमध्ये लेखापरीक्षक बदलण्याची आवश्यकता किंवा गरज ही कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) अंतर्गत एनसीएलटी (NCLT) चे अधिकार सक्रिय/नियंत्रित करत नाही. त्याऐवजी, एका लेखापरीक्षकाच्या फसव्या कृत्याची ही चौकशी आहे, जो कायदेशीररीत्या निर्धारित केलेली स्वतंत्र भूमिका आणि जबाबदाऱ्या सोडून देतो आणि कर्मचारी व्यवस्थापनेशी संगनमत करतो किंवा अन्यथा फसवणूक करतो. हे सादर करण्यात आले आहे की तरतूद/कलमांचा सार म्हणजे लेखापरीक्षकाच्या फसव्या वर्तनाचे निर्धारण आहे. २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) द्वारे विचारात घेतलेले परिणामी "काढून टाकणे" हे केवळ एका कंपनीमध्ये किंवा संबंधित कंपनीमध्ये लेखापरीक्षक म्हणून काम करण्याचा बनाव करत नाही तर कोणत्याही कंपनीसाठी तो पाच वर्षांच्या कालावधीसाठी आहे.

३.१५ पुढे असे सादर करण्यात आले आहे की उच्च न्यायालयाने आक्षेपित निकाल आणि आदेशात दिलेल्या २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) चा अर्थ लावणे हे २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) तयार करण्याच्या

उद्देशाच्या आणि हेतूच्या अगदी विरुद्ध आहे आणि त्यामुळे ते उक्त तरतुदीच्या विरुद्ध आहे.

३.१६ विद्वान एएसजी श्री. बलबीर सिंग यांनी सादर केले आहे की युक्तिवादादरम्यान उत्तरवादींच्या वतीने सादर केलेले निवेदन खालीलप्रमाणे आहेः

ए) कायद्याचे कलम १४०(५) हे कायद्याच्या इतर तरतुदींच्या माहितीवरून, केवळ अविचारी लेखापरीक्षकाला राजीनामा देण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आहे. त्यामुळे, कायद्याच्या कलम १४० (५) अंतर्गत याचिका दाखल केल्यानंतर परंतु माननीय एनसीएलटी (NCLT) त्या याचिकेवर आदेश देण्यापूर्वी लेखापरीक्षकाने आपला राजीनामा दिल्यास, कायद्याच्या कलम १४०(५) मागचा उद्देश पूर्ण होतो. कायद्याच्या कलम १४०(५) चे हे स्पष्टीकरण, उत्तरवादीच्या प्रकरणानुसार, तरतुदीच्या साध्या शब्दांवरून स्पष्ट आहे.

बी) कायद्याच्या कलम १४०(५) अन्वये लेखापरीक्षकाच्या विरोधात कारवाई सुरू ठेवल्यास, त्याच्या राजीनाम्यानंतरही कायद्याच्या कलम १४० (५) च्या तरतुदीचे वाचन केले जाईल, ज्यात कायद्याच्या कलम १४०(५) अन्वये कारवाई पूर्ण होईपर्यंत त्याची सेवा चालू राहील असे मानले जाईल.

सी) कायद्याच्या कलम १४०(५) ची दुसरी तरतूद मनमानी, कठोर आणि तापदायक आहे आणि म्हणून त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ५ वर्षांच्या कालावधीसाठी लेखापरीक्षक म्हणून काम करण्याची अनिवार्य

अपात्रता ही तरतूद घटनात्मक बनवण्यासाठी त्याचा अभ्यास केलाच पाहिजे.

डी) कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार विहित केलेल्या कोणत्याही कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून काम करण्याची अपात्रता केवळ संबंधित लेखापरीक्षण भागीदारांपर्यंतच मर्यादित असू शकते आणि संपूर्ण संस्था आणि इतर लेखापरीक्षण भागीदार जे फसव्या कृतीशी किंवा कृत्यांशी संबंधित नव्हते यांच्या संबंधात असू शकत नाही.

३.१७ उपरोक्त निवेदनांची पूर्तता करताना ते खालीलप्रमाणे सादर करण्यात येते...

ए) उत्तरवादिचा युक्तिवाद स्वीकार करणे म्हणजे अर्ध-न्यायिक न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रावर केवळ पक्षाच्या कृतीद्वारे मात करता येते. अधिक लक्षणीय बाब म्हणजे, याचा अर्थ असा होईल की फसव्या वर्तनाची चौकशी विस्कळीत होऊ शकते आणि/किंवा केवळ पक्षाच्या कृतीमुळे समाधानकारक ठरू शकते.

बी) दहशतवादी तरतुद किंवा लेखापरीक्षकाला राजीनामा देण्यास प्रवृत्त करणे यावरील संपूर्ण विवाद असमर्थनीय आहे. कायद्याच्या कलम ४४७ सह परंतु इतकेच मर्यादित नसलेल्या कायद्यात प्रदान केलेल्या फसव्या कारवायांमध्ये सहभागी होण्याचे परिणाम प्रतिबंधक म्हणून काम करतील आणि 'दहशतवादात' कार्य करतील.

सी) अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या संदर्भात (वरील परिच्छेद ९,१७ (ए) आणि (बी) नुसार) अधिनियमाच्या कलम १४० (५) ला जबाबदार धरण्याची मागणी केलेली संपूर्ण रचना म्हणजे तरतुदीचे प्रचलित कायद्यात रूपांतर करणे आहे. [पहा. – **एनईपीसी मायकॉन लिमिटेड -विरुद्ध- मॅग्मा लीजिंग लिमिटेड** (१९९९) ४ एससीसी २५३] शिवाय, उत्तरवादीनी काढलेला अर्थ स्वीकारला गेल्यास, तो विविध विसंगतींना कारणीभूत ठरेल. विशेषतः, इतर कारणांबरोबरचः

i. पहिल्या तरतुदीत लेखापरीक्षकाचे तात्पुरते निलंबन किंवा काढून टाकण्याची तरतूद आहे हे मान्य केले गेले आहे, जर पहिल्या तरतुदी अंतर्गत अर्ज दाखल केला गेला आणि दोषी लेखापरीक्षकाला बदलले (जरी तात्पुरते असले तरी), तर दुसरा परंतुकातील आदेश कधीही पाळला जाऊ शकत नाही. याचे कारण असे की, दोषी लेखापरीक्षकाला, अंतिम आदेशाच्या तारखेपर्यंत, पहिल्या तरतुदीच्या आदेशामुळे कंपनीचा लेखापरीक्षक म्हटले जाऊ शकत नाही.

ii. कायद्याच्या कलम १४०(५) मध्ये दहशतीत काम करण्याचे किंवा अविचारी लेखापरीक्षकाला राजीनामा देण्यास प्रवृत्त करण्याचे कोणतेही कारण नाही. हे असे असण्याचे कारण की कायद्याच्या कलम १४०(५) ची पहिली तरतूद अधिनियमाच्या कलम १४०(५) अंतर्गत केंद्र सरकारने याचिका दाखल केल्यानंतर लेखापरीक्षकाचा बदल करण्यासाठी/कार्यरत लेखापरीक्षकाला काढून टाकण्यासाठी त्वरित कार्य करते. दुसऱ्या शब्दांत, जर कायद्याच्या कलम १४०(५) मागचा हेतू

लेखापरीक्षकाला राजीनामा देण्यास प्रवृत्त करण्याचा असेल तर पहिली तरतूद निरर्थक ठरेल.

डी) कोणत्याही कंपनीकरीता "५ वर्षांच्या कालावधीसाठी" लेखापरीक्षक म्हणून काम करण्याच्या अपात्रतेचा अर्थ 'पाच वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी' असा केला जाऊ शकत नाही. हे असे आहे कारण :

i. भविष्यात या तरतुदीची भीती किंवा गैरवापर हा तरतुदीच्या घटनात्मक वैधतेची चाचणी घेण्यासाठी आधार ठरू शकत नाही.**[पहा मद्रास बार असोसिएशन -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया २०२१ एससीसी ऑनलाईन एससी ४६३ (परिच्छेद १०१-१०२)]**

ii. फसवणूक सर्वकाही दूषित करते आणि आदेशात फसवणुकीची लांबी आणि व्याप्ती तपासून कायद्यातील शिक्षेचा बदल केला जाऊ शकत नाही.

iii कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत काम करण्याची अपात्रता केवळ कोणत्याही कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून काम करण्यासाठी आहे. हे संबंधित लेखापरीक्षकाला सामान्यतः सनदी लेखापाल म्हणून काम करण्यापासून रोखत नाही. एखादी व्यक्ती किंवा संस्था संबंधित कंपनीच्या खात्यांशी इतर कोणतेही काम करू शकते (जे कलम १४४ नुसार लेखापरीक्षकांसाठी प्रतिबंधित आहे) जसे की खाते आणि बूककीपिंग सेवा, विमा सेवा इ. किंवा अन्यथा. खरे तर, प्रस्तुत प्रकरणात, संबंधित लेखापरीक्षण संस्थांचा लेखापरीक्षण कार्या व्यतिरिक्त बाहेरील व्यवसाय हा त्यांचा खूप महत्त्वाचा भाग आहे. ५ वर्षांच्या बंदीमुळे सनदी लेखापाल म्हणून

त्यांच्या धंद्यावर किंवा सेवेच्या इतर कोणत्याही क्षेत्रावर परिणाम होत नाही; आणि

iv. वैधानिक योजना आणि सार्वजनिक धोरणाच्या संदर्भात विद्यमान एनसीएलटी (NCLT) ने फसवणूक केल्याचे आढळून आल्या वरच ५ वर्षांचा निश्चित प्रतिबंध कालावधी सक्रिय होतो. प्रमाणबद्धतेचे तत्त्व अशा पातळीपर्यंत वाढवले जाऊ शकत नाही जिथे फसवणुकीची व्याप्ती तपासणे आवश्यक आहे. तरतुदीचा अत्यंत प्रतिबंधक परिणाम कमी होईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इतर कंपन्यांच्या संबंधातील फसवणूक कायम राखण्यासाठी याचा उपयोग होईल.

v. कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदी अंतर्गत विहित केलेल्या अपात्रतेच्या अर्जांच्या व्याप्तीबाबत हे सादर सादर करण्यात आले आहे की कायद्याच्या तरतुदींचे बारकाईने वाचन केल्यास असे आढळून येते की विधिमंडळाने कायद्याच्या कलम १४०(५) च्या परिणामाशी संबंधित प्रत्येक पैलूचा विचार केला. कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीच्या तपासणीत असे दिसून आले आहे की माननीय एनसीएलटी (NCLT) ने फसवणुकीच्या संदर्भात आणि लेखापरीक्षक हि एक कंपनी आहे की व्यक्ती याबाबत विशिष्ट निष्कर्ष देणे आवश्यक आहे.केवळ एखाद्या

व्यक्तीच्या संबंधात फसवणूक आढळल्यास कंपनीद्वारे फसवणुक झाल्याचे निर्धारण आपोआप होईल असा कोणताही अंदाज असू शकत नाही.हे कायद्याच्या कलम १४७ अंतर्गत देखील प्रदान केले आहे जे खालीलप्रमाणे आहेः

*(५) लेखापरीक्षण संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या कंपनीच्या लेखापरीक्षणाच्या बाबतीत, लेखापरीक्षण संस्थेच्या एक किंवा अनेक भागीदाराने किंवा कंपनीने किंवा तिचे संचालक किंवा अधिकारी यांच्याद्वारे किंवा त्यांच्या संबंधात फसवणुकीचे कृत्य केले आहे किंवा कोणत्याही फसवणुकीत हातमिळवणी केली आहे हे सिद्ध झाल्यास, या कायद्यात किंवा सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात तरतूद केल्याप्रमाणे दिवाणी किंवा फौजदारी असे लेखापरीक्षण संस्थेचे आणि संस्थेचे संबंधीत एक किंवा अनेक भागीदार यांचे संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे दायित्व असेल.*

*परंतु, लेखापरीक्षण संस्थेच्या फौजदारी दायित्वाच्या बाबतीत, दंडाशिवाय इतर दायित्वाच्या संदर्भात, संबंधित एक किंवा अनेक भागीदार, ज्याने फसवणुकीच्या पद्धतीने काम केले किंवा कोणत्याही फसवणुकीत, यथास्थिती, मदत केली किंवा संगनमत केले असेल तर केवळ तेच जबाबदार असतील.*

३.१८ आतापर्यंत जे प्रतिवादींच्या वतीने सादर केले गेले आहे की एकदा लेखापरीक्षकाने राजीनामा दिल्यावर कायद्याच्या कलम १४०(५) च्या तरतुदी लागू होणार नाहीत.त्याऐवजी, संबंधित लेखापरीक्षकाच्या विरोधात कायद्याच्या कलम २४१(३) अंतर्गत कारवाई केली जाऊ शकते आणि कायद्याच्या कलम २४१(३) नुसार कार्यवाही केल्यास तोच परिणाम दिसून येईल आणि लेखापरीक्षक कोणत्याही कंपनीच्या वर्तनाशी आणि कर्मचारी व्यवस्थापन संबंधित इतर कोणत्याही कार्यालयात नियुक्त करण्यासाठी 'योग्य आणि उचित व्यक्ती' नसल्याचे मानले जाईल.असे सादर करण्यात आले आहे कीः

ए. कलम २४१ (३) आणि त्याच्या परिणाम स्वरूप असलेल्या तरतुदी १४/०८/२०१९ पासून लागू करण्यात आल्या, ज्याने अधिनियमाच्या कलम २४१ (३) मध्ये नमूद केलेल्या व्यक्ती "संचालकाचे पद किंवा कोणत्याही कंपनीच्या वर्तनाशी आणि कर्मचारी व्यवस्थापन संबंधित इतर कोणत्याही पदावर राहण्यासाठी योग्य आणि उचित व्यक्ती नाहीत" असे घोषित करण्याच्या विनंतीसह न्यायाधिकरणाकडे अर्ज करण्यास केंद्र सरकारला अधिकृत केले.

बी. जेव्हा "कोणत्याही कंपनीच्या वर्तनाशी आणि कर्मचारी व्यवस्थापन संबंधित इतर कोणतेही कार्यालय" बाबतीत विशेषतः कायद्याच्या कलम २४१(३) सह अधिनियमित केलेल्या परिणामी तरतुदींचा विचार करता त्या सह अधिनियमीत केलेले कायद्याचे कलम २४३(१ए) आणि कलम २४३(२) या तरतुदींचा विचार करणेही आवश्यक ठरेल.

*(१ ए) कलम २४२ च्या उपकलम (४ए) नुसार योग्य आणि उचित नसलेली व्यक्ती, उक्त निर्णयाच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीच्या संचालकाने किंवा इतर कार्यालयातील वर्तन व व्यावहारिक व्यवस्थापन संबंधित पद किंवा इतर कोणतेही पद धारण करणार नाही*

*(२) उप-कलम (१) किंवा उप-कलम (१ ए) च्या खंड (बी) चे उल्लंघन करून एखाद्या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक किंवा इतर संचालक किंवा व्यवस्थापक म्हणून जाणूनबुजून काम करणारी कोणतीही व्यक्ती आणि कंपनीचे इतर प्रत्येक संचालक जे जाणूनबुजून अशा*

*उल्लंघनात सहभागी आहेत त्यांना पाच लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते.*

स्पष्टपणे, परिणामी तरतुदीच्या शब्दांवरून, हे स्पष्ट आहे की कायद्याच्या कलम २४१(३) मधील विशेषत: "कोणतेही कार्यालय जे कंपनीचे आचरण आणि व्यवस्थापनाशी संबंधित आहे" म्हणजे व्यवस्थापक, व्यवस्थापकीय संचालक किंवा इतर संचालक सामान जसे की प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी परंतु लेखापरीक्षक नाही

सी. शिवाय, कायद्याच्या कलम २४१(३) मध्ये विशेषतः 'कंपनीचे आचरण आणि कर्मचारी व्यवस्थापन हे शब्द वापरले आहेचे दुसरे. कायद्यात नमूद केल्याप्रमाणे लेखापरीक्षक हा खात्यांचा स्वतंत्र परीक्षक असतो आणि तो कंपनीच्या आचरणात आणि कर्मचारी व्यवस्थापन पद धारण करतो असे म्हणता येणार नाही. हे कंपनी कायदा, २०१३ च्या तंतुविरूद्ध लढा देईल.

३.१९ वरील निवेदन करताना, असे सादर केले जाते की, (i) कायदा, २०१३ चे कलम १४०(५) हे दिवाणी न्यायालयाच्या अधिकारांनी सुसज्ज अर्ध-न्यायिक न्यायाधिकरणाला लेखापरीक्षकांच्या भूमिकेचे परीक्षण करण्यास आणि त्यांच्या फसव्या वर्तनावर आणि त्यांच्या कार्याचा त्याग करण्यावर: अभिनिर्णय घेण्यास सक्षम करते; (ii) कलम १४०(५) ही केवळ राजीनामा न देणाऱ्या लेखापरीक्षकाचा बदल करण्यास प्रवृत्त/प्रभावी करण्याची तरतूद नाही. हे एक तरतूद म्हणून अभिप्रेत आहे की ज्यामध्ये फसवणुकीचे ठोस निर्धार जे एखाद्या ऑडिटरला कंपनीमधून किंवा तो/ती ऑडिट करत असलेल्या कोणत्याही कंपनीमधून वेगळे करणे किंवा काढून टाकणे समाविष्ट

आहे. केवळ अविचारी लेखापरीक्षकाला बदलण्यास प्रवृत्त करण्यासाठीची तरतूद म्हणून याचा अर्थ लावला गेला, तर लेखापरीक्षकाच्या फसव्या वर्तनाची चौकशी करण्यासाठी एनसीएलटी (NCLT) ला अधिकार देणारे शब्द निरर्थक ठरतील; (iii) कायद्याच्या कलम १४०(५) ची दुसरी तरतूद योगायोगाने त्याचा दंडात्मक परिणाम देखील होऊ शकतो तरी मूलतः ती उपचारात्मक आणि प्रतिबंधात्मक आहे, या कलमाच्या दुसऱ्या तरतुदीचा सार्वजनिक हेतू/उद्देश म्हणजे स्पष्टपणे कंपन्यांना त्यांचा पूर्वग्रहदूषित होण्यापासून वाचवणे, अशा लेखापरीक्षकाला, ज्याने फसवणूक केल्याचे मानले गेले आहे, कोणत्याही कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यापासून प्रतिबंधित करणे हा आहे.

३.२० हे सादर केले जाते की सध्याच्या प्रकरणातील तथ्यांमध्ये हे लक्षात घेणे योग्य आहे कीः

ए) डेलॉयट हे २००८ ते २०१८ पर्यंत आयएफआयएन (IFIN) चे वैधानिक लेखापरीक्षक होते. डेलॉईट २०१८ मध्ये कालबद्धतेने निवृत्त झाले;

बी) बीएसआर (BSR) यांची २०१७ मध्ये संयुक्त वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली;

सी) डेलॉईट आणि बीएसआर (BSR) या दोघांनी संयुक्तपणे वित्तीय वर्ष २०१७-२०१८ साठी आयएफआयएन (IFIN) चे वैधानिक लेखापरीक्षण केले;

डी) याचिकाकर्ते म्हणजे, भारत सरकारने १ जून २०१९ रोजी बीएसआर (BSR) आणि डेलॉयट या दोघांविरुद्ध कायद्याच्या कलम १४० (५) अंतर्गत याचिका दाखल केली. त्यावेळी बीएसआर (BSR) हे वैधानिक लेखापरीक्षक होते.

इ) ही याचिका एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) च्या अहवालावर आधारित आहे, ज्यामध्ये असा आरोप करण्यात आला आहे की, डेलॉयट आणि बीएसआर (BSR) या दोन्ही लेखापरीक्षकांनी फसव्या पद्धतीने काम केले. यामध्ये डेलॉईट एकमेव लेखापरीक्षक असतानाचा कालावधी आणि बीएसआर(BSR) ने संयुक्तपणे लेखापरीक्षण केले त्या वर्षाचा समावेश आहे.

एफ) याचिका दाखल केल्यानंतर, बीएसआर (BSR) ने आपला राजीनामा दिला आणि कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत भारतीय संघाच्या याचिकेच्या समर्थनीयतेला आव्हान देणारा अर्ज जुलै २०१९ मध्ये किंवा त्यासुमारास दाखल केला आणि २०१८ मध्ये निवृत्त झालेल्या डेलॉईटने देखभालक्षमतेसाठी अर्ज सुध्दा दाखल केला होता; आणि

जी) माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीनंतर, भारत सरकारने कायद्याच्या कलम १४०(५) च्या पहिल्या तरतुदीनुसार माननीय एनसीएलटी (NCLT) च्या अधिकारांचा वापर केला आणि आयएफआयएन (IFIN) साठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली.

३.२१ त्यामुळे सध्याच्या खटल्यातील तथ्ये आणि परिस्थितीनुसार आणि वर स्पष्ट केलेल्या कायद्याच्या कलम १४० (५) च्या खऱ्या अन्वयार्थानुसार, उच्च न्यायालयाने एनसीएलटी (NCLT) चा युनिअन ऑफ इंडिया ची २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत दाखल याचिक कायम ठेवण्याचा आदेश आणि लेखापरीक्षक - बीएसआर (BSR) विरुद्ध कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही चा आदेश चुकून रद्द केला.

३.२२ वर सादर केलेल्या, कायद्याच्या कलम १४०(५) च्या व्याख्येप्रमाणे असा युक्तिवाद केला आहे की कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत याचिका दाखल केल्यानंतर बीएसआर (BSR) च्या राजीनाम्याच्या कृतीमुळे कायद्याच्या कलम १४०(५) च्या राजीनाम्याची कृती कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही रद्द करण्यासाठी रोखली जाऊ शकत नाही. कंपनीच्या कर्मचारी व्यवस्थापन आणि/किंवा त्याच्या लेखापरीक्षकांविरुद्ध, केवळ पक्षाच्या रचनेच्या डावपेचामुळे पूर्णपणे निराश झालेल्या फसवणुकीसाठी, माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या व्याख्येमुळे कोणत्याही प्रकारची कार्यवाही होऊ शकते. अशा परिस्थितीत, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित आदेश ग्राह्य शकत नाही आणि तो रद्दबातल करण्यास पात्र आहे.

३.२३ डेलॉईटच्या संदर्भात, असे सादर केले जाते की, माननीय एनसीएलटी (NCLT) आणि एनसीएलएटी (NCLAT) ने कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत याचिकेची कायमता मान्य केली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे, कायद्याच्या कलम १४०(५) मधे कंपनीच्या लेखापरीक्षकाने, प्रत्यक्ष किंवा

अप्रत्यक्षपणे, फसवणुकीच्या पद्धतीने काम केले आहे किंवा कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे, हे स्वतःचे समाधान करणे माननीय एनसीएलटी (NCLT) ला आवश्यक आहे. या संदर्भात निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी, विशेषतः जेव्हा दोघेही २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षक म्हणून काम करत होते, तेव्हा डेलॉयट आणि बीएसआर (BSR) या दोन्ही लेखापरीक्षकांच्या भूमिकेचे परीक्षण करणे महत्त्वाचे आहे. वर नमूद केलेल्या तरतुदीचा अर्थ लक्षात घेऊन, न्यायाधिकरणासाठी समाधानामुळे शेवटी लेखापरीक्षक बदलला जाऊ शकतो, म्हणजे बीएसआर (BSR) बदलला जाऊ शकतो; तथापि, यामुळे कायद्याच्या कलम १४०(५) च्या संदर्भात डेलॉईटच्या फसवणुकीची चौकशी करण्यासाठी माननीय एनसीएलटी (NCLT) ला दिलेले अधिकार हिरावून घेतले जात नाहीत आणि जर डेलॉईट विरुद्धच्या फसवणुकीचे समाधान त्याच्या अंतिम आदेशात नोंदवले गेले तर. त्यामुळे, या प्रकरणातील तथ्यांमध्ये, अंतिम आदेश आणि त्यामुळे दुसरी तरतूद डेलॉईट आणि बीएसआर (BSR) च्या विरोधात काम करू शकते.

३.२४ आता कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाचे कलम २१२(१४) चे निर्देश आणि एसएफआयओ (SFIO) ने दाखल केलेली फौजदारी तक्रार आणि आयएफआयएन (IFIN) एसएफआयओ (SFIO) अहवाल रद्दबताल ठेवण्याकरीता मुंबई उच्च न्यायालयाने आक्षेपित आदेश २१२ (१४) चे निर्देश आणि फौजदारी तक्रार आणि एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) चा अहवाल या आधारावर रद्दबातल केला आहे ---

ए. एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवाल हा अर्धवट तपासावर आधारित अहवाल/अपूर्ण अहवाल आहे आणि त्यामुळे २१२ (१४) चे निर्देश दिले जाऊ शकले नाहीत.या निष्कर्षाचा कथित आधार असा आहे की --- (i) एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवालातील एकेरी परिच्छेद; आणि (ii) २१२ (१४) चे निर्देश ज्यामध्ये काही पैलूंवर आणखी अहवाल मागवण्यात आला आहे, त्यातून हे सिद्ध होते की तपास अपूर्ण आहे; आणि

बी. केंद्र सरकारसमोर एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवाल ठेवल्यानंतर ३० तासांच्या आत २१२(१४) अंतर्गत निर्देश देण्यात आले आणि केंद्र सरकारने इतक्या कमी कालावधीत आपले मन वळवणे अशक्य होते.

आक्षेपित आदेश चुकीचा आहे असे सादर करण्यात आले कारणः

ए. एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवाल हा एसएफआयओ (SFIO) ने आयएफआयएन (IFIN) चा तपास पूर्ण झाल्याबद्दल तयार केलेला अहवाल आहे.माननीय मुंबई उच्च न्यायालयाने या भूमिकेचा स्वीकार केलेला नाही ---

i. ३० सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार, एसएफआयओ (SFIO) ने आयएलअँडएफएस (IL&FS) आणि त्याच्या सहाय्यक कंपन्यांचे आयएलअँडएफएस (**IL&FS Group**) समूह चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. १००-१६९ घटक;

ii. ३० नोव्हेंबर २०१८ रोजी एसएफआयओ (SFIO) च्या अंतरिम अहवालात नमूद केलेल्या आयएलअँडएफएस (IL&FS) समूहाच्या

व्यवहारांच्या आचरणात स्पष्टपणे नमूद केले आहे की गटामध्ये अनेक परस्पर संबंध, दैनंदिन व्यवहार इ. होते.

iii. आयएफआयएन ( IFIN) ही आयएलअँडएफएस (IL&FS) समूहातील आणि वित्तीय सेवा शाखेतील एक उप-कंपनी आहे.यामुळे आयएलअँडएफएस (IL&FS) समूहातील विविध समूह कंपन्यांना त्रयस्थ असामीच्या कर्जदारांकडून कर्ज घेणे सुलभ झाले आणि काही वेळा निधी एका समूह कंपनीकडून दुसऱ्या समूह कंपनीकडे वळवला गेला.

iv. आयएलअँडएफएस (IL&FS) समूहातील विविध संस्थांमधील परस्पर संबंध आणि परस्पर संबंधांचे स्वरूप लक्षात घेता, एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवालात असे नमूद केले आहे की एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवाल हा आयएफआयएन (IFIN) च्या संदर्भात एक अहवाल आहे आणि आयएफआयएन (IFIN) चा तपास पूर्ण झाल्यानंतरचा अहवाल आहे; आणि

v. शेवटी, एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवालात, आयएलअँडएफएस (IL&FS) समूहाच्या गुंतागुंतीच्या संरचनेच्या प्रकाशात आणि संस्थांमधील परस्पर संबंध इत्यादींच्या प्रकाशात असे नमूद केले आहे की आयएलअँडएफएस (IL&FS) च्या इतर समूह कंपन्यांच्या तपासादरम्यान आयएफआयएन (IFIN) च्या पुढील घटना किंवा व्यवहार उघड झाल्यास पुढील अहवाल दाखल केला जाईल.

याचा अर्थ असा नाही की आयएफआयएन (IFIN) चा तपास अपूर्ण आहे. किंबहुना, काही पैलूंवर (जे त्रयस्थ पक्षांशी संबंधित असू शकतात) पुढील अहवाल मागवण्याची निर्देशही इतर सर्व बाबींमध्ये तपास पूर्ण झाल्याच्या स्थितीपासून विचलित होत नाही. एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवाल अपूर्ण आहे आणि/किंवा आयएफआयएन (IFIN) चा तपास अपूर्ण आहे असे मानण्यात माननीय मुंबई उच्च न्यायाल्याने मूलभूतपणे चूक केली आहे. प्रस्तुत प्रकरणात, आयएफआयएन (IFIN) आणि त्यात सामील असलेल्या अनेक पक्षांच्या तपशीलवार आणि व्यापक तपासानंतर एसएफआयओ (SFIO) ने एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवाल सादर केला. हे सादर केले जाते की प्रत्येक लेखापरीक्षक/सी.ए. विरुद्ध अनेक उल्लंघने, वैधानिक कर्तव्यांचे उल्लंघन आणि संबंधित वेळी लेखापरीक्षकांच्या कामकाजाच्या संदर्भात फसव्या वर्तनाकडे लक्ष वेधणारे निर्णायक निष्कर्ष होते.

बी. २१२ (१४) निर्देश हे ३० तासांच्या आत जारी करण्यात आले होते असा उत्तरवादींचा वरवरचा युक्तिवाद मुंबई उच्च न्यायालयाने स्वीकारण्यास सुरुवात केली आहे, जे खालील बाबींचा बुद्धीचा वापर न करता लागू केल्याचे दर्शवतेः

i. २१२ (१४) निर्देश स्वतःच बुद्धीचा वापर केल्याचे दर्शविते की हे निर्देश एसएफआयओ (SFIO) ला अतिरिक्त व्यक्तींवर खटला चालवण्याची विनंती करते ज्यांचा सहभाग एसएफआयओ (SFIO) आयएफआईएन (IFIN) अहवालाच्या वाचनातून स्पष्ट झाला आहे. एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवालाचा विचार केला असता तरच हे शक्य झाले असते. खरे तर, २१२(१४) निर्देश

देण्यासाठी किंवा तपास पूर्ण झाला आहे आणि दुसऱ्या अंतरिम अहवालाला मंत्रालयाने अंतरिम अहवाल मानले नाही, असे कोणतेही प्रतिज्ञापत्र किंवा युक्तिवादाची नोंद घेतली नाही. तपास पूर्ण झाला नसल्याची शपथ घेऊन प्रतिज्ञापत्र दाखल न करण्याचे परिणाम एसएफआयओ (SFIO) टाळू शकत नाही. हा वस्तुस्थितीचा प्रश्न आहे;

xv) कलम २१२(१२), तपास पूर्ण होईपर्यंत जारी केलेल्या अहवालाच्या आधारे दावा सुरू करण्याची परवानगी देत नाही. कलम २१२(१२), (१४) आणि (१५) च्या संयुक्त वाचनाने हे स्पष्ट होते. पुढे, जरी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता चे कलम १७३(८) कलम १७३(२) अंतर्गत अहवाल दाखल केल्यानंतर पुढील तपासाचा विचार करत असले, तरी कलम १७३(८) निरीक्षकाला अपूर्ण किंवा प्राथमिक अहवाल सादर करण्यास आणि नंतर अंतिम अहवाल सादर करण्यास सक्षम करत नाही. खाली दिलेल्या प्रकरणातील न्यायनिर्णयांवर भर देण्यात येत आहे, ***कमल लोचन सेन - विरुद्ध - स्टेट ऑफ ओरिसा, (१९८२) ५४ सीएलटी ५०९*** (परिच्छेद ५) आणि ***एव्ही धर्म रेड्डी -विरुद्ध- स्टेट ऑफ ए. पी. आणि इतर, २०११ सीआरआयएलजे १८५*** (परिच्छेद ५). त्यामुळे, एसएफआयओ (SFIO) आणि मंत्रालयाने "अंतरिम अहवालाच्या" आधारे कारवाई करण्यासाठी आणि त्याच वेळी पुढील तपास सुरू ठेवण्यासाठी अवलंबलेली रणनीती बेकायदेशीर आहे;

xvi) तपास स्वतःच पूर्ण झाला नसल्यामुळे आणि दुसरा अंतरिम एसएफआयओ (SFIO) अहवाल हा केवळ एक अंतरिम अहवाल असल्याने, कलम २१२(१४) अंतर्गत खटला सुरू करण्यासाठी

मंत्रालयाने निर्देश जारी करण्यास कोणताही आधार नव्हता. त्यानुसार, मंजुरीचा आदेश अत्यंत होकारार्थी आहे. ती मंजुरी ठरत नाही आणि खटला सुरूवातीपासूनच शून्य आणि रद्दबातल आहे;

xvii) संबंधित वस्तुस्थिती आणि पुराव्यावर विचार न करता मंजुरीचा आदेश पारित करण्यात आला;

xviii) कलम २१२(१४) मध्ये केंद्र सरकारद्वारे 'तपासणी' आवश्यक आहे आणि आवश्यक असल्यास 'कायदेशीर सल्ला' घेण्याचा विचारही केला आहे. कलम २१२(१४) अंतर्गत आदेश पारित करताना आवश्यक असलेली उच्च दर्जाची काळजी संसद ठरवते. त्यामुळे केंद्र सरकारचा निर्णय तर्कशुद्ध असला पाहिजे आणि त्याचा योग्य प्रकारे वापर केला गेला पाहिजे.

xix) कायद्यानुसार, मंजुरीच्या आदेशाने वस्तुस्थितीची पर्याप्तता तसेच संबंधित तथ्ये, वस्तुस्थिती आणि पुराव्यांचा विचार दोन्ही उघड करणे आवश्यक आहे. ***मनसुखभाई विठ्ठलदास चौहान - विरुद्ध - स्टेट ऑफ गुजरात, (१९९७) ७ एस. सी. सी. ६२२*** (परिच्छेद १७, १८ आणि १९) या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भर दिला आहे.

xx) एसएफआयओ (SFIO) ने दिनांक २८.०५.२०१९ रोजी दुसरा अंतरिम एसएफआयओ (SFIO) अहवाल सादर केला. हे मान्य आहे की, अहवाल ३२,००० हून अधिक पानांचा आहे, ज्यामध्ये अहवालाचा मुख्य भागच अंदाजे ७८७ पानांचा आहे. २ रा अंतरिम एसएफआयओ

(SFIO) अहवालाची प्रक्रिया अधिकारी (कायदेशीर विभाग), मंत्रालयाने कथितपणे तपासणी केली होती, ज्याने प्रक्रिया नोंद तयार केली होती. ही प्रक्रिया नोंद कथितपणे तातडीच्या प्राधान्याच्या आधारावर 'वरिष्ठ अधिकाऱ्याला' सादर करण्यात आली होती. वरील अंतर्गत प्रक्रिया असूनही, मंत्रालयाने दिनांक २९.०५.२०१९ रोजी (म्हणजे, एका दिवसात) मंजुरी आदेश जारी केला. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, ०१.१०.२०१९, १०.१०.२०१९ आणि १४.१०.२०१९ या तारखेच्या ईमेलद्वारे तपासणीसाठी वारंवार विनंत्या करूनही या प्रक्रिया नोंदीची प्रत मुंबई उच्च न्यायालयासमोर ठेवली गेली नाही किंवा बीएसआर (BSR) ला पुरवली गेली नाही. मंत्रालय आणि एसएफआयओ (SFIO) कोणत्याही दस्तऐवजाद्वारे किंवा प्रतिज्ञापत्राद्वारे विवेकबुद्धीचा योग्य वापर दर्शविण्यात अपयशी ठरल्यामुळे, अशा परिस्थितीत मुंबई उच्च न्यायालयाने प्रतिकूल निष्कर्ष काढणे योग्य होते.

xxi) दुसऱ्या अंतरिम एसएफआयओ (SFIO) अहवालाचे प्रचंड स्वरूप आणि तेथील अंतर्गत प्रक्रिया लक्षात घेता, मंत्रालयाने मंजुरी आदेश जारी करण्यापूर्वी एका दिवसाच्या आत दुसऱ्या अंतरिम एसएफआयओ (SFIO) अहवालाचे (कायद्याच्या कलम २१२(१४) अंतर्गत आवश्यकतेनुसार) परीक्षण करणे आणि त्यावर आपले विचार लागू करणे अशक्य होते. वर वर्णन केलेल्या घटना स्पष्टपणे दर्शवतात की, मंजुरीचा आदेश घाईघाईने, विचार न करता आणि भिन्न विचारांसाठी देण्यात आला होता. अशा प्रकारे, अशा मंजुरी आदेशानंतरची कार्यवाही देखील रद्दबातल होते. ***के. के. मिश्रा -विरुद्ध- स्टेट ऑफ मध्य प्रदेश, (२०१८) ६ एससीसी. ६७६*** (परिच्छेद १८) आणि

***अनिरुद्धसिंहजी करणसिंहजी जडेजा - विरुद्ध - स्टेट ऑफ गुजरात (१९९५) ५ एससीसी ३०५*** (परिच्छेद १५) या प्रकरणांमधील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयांवर भर दिला जातो.

xxii) पुढे, त्यांच्या अधिकाऱ्यांनी दुसऱ्या अंतरिम एसएफआयओ (SFIO) अहवालावर स्वतंत्रपणे त्यांचे विचार लागू केले हे दाखवण्यासाठी कोणताही पुरावा सादर करण्यात मंत्रालयाचे अपयश हे देखील उघड करण्याच्या कर्तव्याशी संबंधित तत्त्वांच्या विरुद्ध आहे कारण उघड केल्याने कार्यवाहीच्या निष्पक्षतेचे संरक्षण होईल आणि प्रसंभाविक प्रक्रिया पारदर्शकता देखील वाढेल. ***टी. टेक्रो - विरुद्ध - एसईबीआय, (२०२२) ८ एससीसी १६२*** (परिच्छेद ६२.३) च्या प्रकरणामधील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भर देण्यात आला आहे;

xxiii) त्यामुळे असे सादर केले जाते की मंजुरीचा आदेश कायद्याने चुकीचा आहे आणि मुंबई उच्च न्यायालयाने तो योग्यरित्या रद्दबातल केला;

xxiv) अधिकारक्षेत्रासाठी अनिवार्य पूर्वअट म्हणजे वैध मंजुरीचे अस्तित्व. त्यामुळे, खटला अक्षम होतो आणि परिणामी कार्यवाही रद्दबातल होते आणि जिथे कोणतीही वैध मंजुरी दिली जात नाही अशा अधिकारक्षेत्राशिवाय होते. ***गोकुळचंद द्वारकादास मोरारका -विरुद्ध- दी किंग, (१९४७-४८) ७५ आयए ३०; युसोफल्ली मुल्ला नुबभॉय- विरुद्ध- दी किंग, १९४९ क्रिएलजे ८८९*** (परिच्छेद १५); ***मोहम्मद इक्बाल***

***अहमद - विरुद्ध- स्टेट ऑफ आंध्र प्रदेश, (१९७९) ४ एससीसी*** **१७२** (परिच्छेद ३);

xxv) एमसीए (MCA) ने कलम २१२(१४) अंतर्गत जारी केलेला मंजुरी आदेश अवैध आणि अस्तित्वहीन आहे. अशा परिस्थितीत, असे सादर केले जाते की, एसएफआयओ (SFIO) ने सुरू केलेला खटला कोणत्याही मंजुरीच्या अनुपस्थितीत आहे आणि त्यामुळे रद्दबातल आहे आणि कोणत्याही अधिकारक्षेत्राशिवाय आहे.

४.२ फौजदारी अपील क्रमांक २३००/२०११ मध्ये उत्तरवादी क्रमांक १ च्या वतीने हजर झालेल्या विद्वान वकिलांनी - हरी संकरन यांनी याशिवाय, पुढे सांगितले आहे की, प्रस्तुत प्रकरणात एसएफआयओ (SFIO) च्या नात्याने हरि संकरन यांचे द्वारा कोणताही अंतिम तपास अहवाल दाखल केलेला नाही. असे सादर केले जाते की, हरि संकरण द्वारा दुसरा अहवाल हा अंतिम तपास अहवालाच्या स्वरूपाचा नाही. असे सादर केले जाते की, दुसरा अहवाल हा हरि संकरण च्या नात्याने अंतिम तपास अहवाल नसल्यामुळे, संबंधित खटला चालवण्याचे निर्देश जारी केले जाऊ शकत नव्हते आणि त्यामुळे परिणामी हरि संकरण च्या नात्याने तक्रार दाखल केली जाऊ शकली नसती.

४.३ वरील निवेदन सादर करीत आणि उपरोक्त निर्णयांवर भर देत मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने हजर असलेल्या विद्वान वकिलांनी प्रस्तुत अपील फेटाळण्याची आणि उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निकाल आणि आदेश कायम ठेवण्याची विनंती केली आहे.

## कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४०(५) चे विश्लेषण आणि व्याख्याः

**५.** अधिनियम, २०१३ च्या कलम १४०(५) मध्ये 'लेखापरीक्षकाला हटवणे, लेखापरीक्षकाचा राजीनामा आणि विशेष नोटीस देणे' या शीर्षकाखाली अधिनियमाच्या प्रकरण X मध्ये 'लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षक' असे शीर्षक आहे. त्यामुळे, 'लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षकांच्या' संदर्भात नवीन कायद्यांतर्गत प्रकरण X ही एक विशेष तरतूद आहे. कोणत्याही कंपनीच्या कामकाजाच्या बाबतीत लेखापरीक्षक खूप महत्वाची भूमिका बजावतो आणि म्हणूनच तो स्वतंत्र आणि मंडळाच्या वर असला पाहिजे यात वाद नाही. कंपनी कायदा, २०१३ हा वित्तविषयक संसदीय स्थायी समितीचा अहवाल तसेच कंपनी विधेयक, २००९ आणि कंपनी विधेयक, २०११ सादर करून स्थायी समितीच्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर तपशीलवार अभ्यासाच्या परिणामाचा परिणाम आहे. पूर्वीचे कंपनी विधेयक, २००९ सादर केले गेले तेव्हा ते वाढत्या कॉर्पोरेट अर्थव्यवस्थेचे संकलन होते आणि कॉर्पोरेट फजितीचा भूतकाळातील अनुभव होता आणि लेखापरीक्षकांसाठी कठोर उत्तरदायित्व प्रदान करणे ही एक सूचना होती. लेखापरीक्षकांची भूमिका, जबाबदारी, कर्तव्ये आणि नियमन आणि नियामक आणि अंमलबजावणीच्या तरतुदींवर दीर्घ चर्चा झाली. लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षकांशी संबंधित तरतुदी अधिक कठोर करण्यासाठी विविध सूचना प्राप्त झाल्या. २००९ च्या विधेयकाच्या खंड १२३(१०) वर असे सुचवण्यात आले होते की, ज्यात फसवणूक झाली आहे आणि कायद्याच्या कलम १४०(५) शी संबंधित आहे असे आढळून आल्यानंतर एनसीएलटी (NCLT) द्वारे लेखापरीक्षकाला हटवण्याची तरतूद आहे आणि न्यायाधिकरणाने काढून टाकलेला लेखापरीक्षक पाच वर्षांच्या

कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र नसावा याचा विचार केला पाहिजे.

**५.१** या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, कायद्याचे कलम १४३ लेखापरीक्षकांचे अधिकार आणि कर्तव्ये हाताळते. कलम १४३ च्या उपकलम (१२) मध्ये विशेषतः अशी तरतूद आहे की, कंपनीमध्ये फसवणुकीचा गुन्हा होत आहे किंवा केला गेला आहे असे लेखापरीक्षकाला वाटत असल्यास, लेखापरीक्षक केंद्र सरकारला या प्रकरणाचा अहवाल देईल. या संदर्भात जारी केलेल्या नियमांनुसार तपशीलवार प्रक्रिया प्रदान केली आहे. त्यामुळे, कंपनीमध्ये होत असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्याबाबत केंद्र सरकारला अहवाल देणे हे लेखापरीक्षकाचे वैधानिक कर्तव्य आहे. लेखापरीक्षक कंपनीमध्ये कोणतेही पद धारण करत नाही आणि तो स्वतंत्रपणे काम करतो हे पाहण्यासाठी, कायद्याच्या कलम १४४ मध्ये अशी तरतूद आहे की, लेखापरीक्षक व्यवस्थापन सेवांसह काही सेवा देऊ शकत नाही. लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण सेवांच्या व्याप्तीबाहेरील त्याच्या कोणत्याही क्रियाकलापांमुळे प्रभावित न झालेली एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून काम करावे हा उद्देश असल्याचे दिसते. लेखापरीक्षकाला कंपनीला कोणतीही व्यवस्थापन सेवा प्रदान करण्यास मनाई आहे. अशा प्रकारे, कायद्याच्या कलम १४४ अंतर्गत तयार केलेली बंदी आणि निर्बंध प्रामुख्याने संबंधित कंपनीच्या आणि कर्जदार आणि गुंतवणूकदार आणि मोठ्या प्रमाणात जनतेसारख्या इतर भागधारकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आहेत. उपरोक्त तरतुदी आणि पार्श्वभूमीतील अंतर्निहित सार्वजनिक धोरण लक्षात घेऊन, कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) चा अर्थ लावणे आणि/किंवा त्यावर विचार करणे आवश्यक आहे.

५.२ कायद्याच्या कलम १४०(१) मध्ये लेखापरीक्षकाला त्याची मुदत संपण्यापूर्वी कंपनीकडून काढून टाकण्याच्या प्रक्रियेची तरतूद आहे; कायद्याचे कलम १४०(२) आणि (३) लेखापरीक्षकांच्या राजीनाम्याशी संबंधित आहे आणि कायद्याचे कलम १४०(४) सेवानिवृत्त लेखापरीक्षकांव्यतिरिक्त इतर लेखापरीक्षकाच्या नियुक्तीसाठी एजीएम(AGM) मध्ये विशेष नोटीस देण्याशी संबंधित आहे. तथापि, कायद्याचे कलम १४०(५) न्यायाधिकरणाला (एनसीएलटी) (NCLT) एकतर स्वतःहून किंवा केंद्र सरकारने किंवा संबंधित कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अर्जावर, ज्या लेखापरीक्षकाने फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनीच्या कर्मचारी व्यवस्थापनास फसवणुकीस प्रवृत्त करत आहे किंवा संगनमत करत आहे, त्या लेखापरीक्षकाच्या विरोधात कारवाई करण्याचा अधिकार देते. जर चौकशी पूर्ण झाल्यावर न्यायाधिकरणाला असे आढळून आले की कंपनीच्या लेखापरीक्षकाने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसवणूक केली आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकारी यांच्याद्वारे किंवा त्यांच्या संबंधाद्वारे कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे, तर ते आदेशाद्वारे कंपनीला त्याचे लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देऊ शकते. त्यामुळे, कलम १४०(५) च्या पहिल्या भागात एनसीएलटी (NCLT) चे अधिकार अर्ध-न्यायिक स्वरूपाचे आहेत आणि न्यायाधिकरणाला लेखापरीक्षकांच्या भूमिकेची तपासणी करण्याचे आणि त्यांच्या फसव्या वर्तनावर आणि त्यांच्या कार्याचा त्याग करण्यावर अभिनिर्णय घेण्याचे दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील. कलम १४०(५) चा पहिला भाग केंद्र सरकारने केलेल्या अर्जावर न्यायाधिकरणाला अधिकार प्रदान करतो आणि लेखापरीक्षकाचा बदल आवश्यक असल्याचे न्यायाधिकरणाला

समाधान झाल्यास, अशा लेखापरीक्षकाला काढून टाकण्याचा आणि/किंवा असा लेखापरीक्षक लेखापरीक्षक म्हणून काम करणार नाही असा आदेश (असा अर्ज मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत) पारित करु शकतों आणि केंद्र सरकार त्याच्या जागी दुसऱ्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करू शकते. अशा प्रकारे, कलम १४०(५) च्या पहिल्या तरतुदीखालील अधिकार हे विद्यमान लेखापरीक्षकाची सेवा अखंडित ठेवण्यापासून रोखण्यासाठी तसेच फसवणूक झाली आहे अशा सकृतदर्शनी पूर्तीच्या आधारे, त्याजागी दुसऱ्या लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यासाठी व जेव्हा परिस्थिती बदलण्याची मागणी असते तेव्हा हा अंतरिम किंवा तात्पुरता उपाय असल्याचे म्हटले जाऊ शकते - असा आदेश हा कायद्याच्या कलम १४०(५) मध्ये प्रदान केल्यानुसार तपशीलवार चौकशी प्रलंबित असताना आणि न्यायाधिकरणाने कोणताही अंतिम आदेश पारित करण्यापूर्वी तात्पुरत्या निलंबनासारखा अंतरिम आदेश असल्याचे म्हटले जाऊ शकते.

५.३ कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीत पुढे अशी तरतूद करण्यात आली आहे की,ज्या लेखापरीक्षकाच्या विरोधात न्यायाधिकरणाने कलम १४०(५) अंतर्गत अंतिम आदेश दिला आहे, तो लेखा परीक्षक, मग तो व्यक्ती असो किंवा कंपनी, तो आदेश पारित झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र राहणार नाही आणि कंपनी कायद्याच्या कलम ४४७ अंतर्गत अशा कारवाईसाठी लेखापरीक्षक देखील जबाबदार असेल. त्यामुळे, कलम १४०(५) ची दुसरी तरतूद ही एक मूलभूत तरतूद असल्याचे म्हटले जाऊ शकते आणि ती कलम १४०(५) (पहिला भाग) अंतर्गत न्यायाधिकरणाने पारित केलेल्या अंतिम आदेशान्वये लागू होते. या टप्प्यावर, हे लक्षात घेणे

आवश्यक आहे की कंपनी विधेयक, २००९ च्या बाबतीत मागील स्थायी समितीने केलेल्या शिफारशी आणि विविध भागधारकांच्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर, कंपनी विधेयक २०११ सादर करण्यात आले. २००९ च्या विधेयकाच्या कलम १२३(१) नुसार स्थायी समितीची सूचना (ज्यात फसवणूक झाल्याचे आढळून आल्यानंतर एनसीएलटी (NCLT) ने लेखापरीक्षकाला सदर फसवणुकीसाठी काढून टाकण्याची सूचना केली होती) ही सूचना सदर तरतुद अशा लेखापरीक्षकासाठी अधिक कठोर करण्यासाठी व पुढील परिणामांसाठी होती जो लेखापरीक्षक फसवणुक केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून येतो व सदर फसवणूक केल्याबद्दल एनसीएलटी (NCLT) द्वारे त्याला काढून टाकण्यात येते. २०१३ च्या कायद्याच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीद्वारेही असेच केले गेले आहे. म्हणून, कलम १४०(५) ची दुसरी तरतूद, जी वर नमूद केल्याप्रमाणे, एक ठोस तरतूद आहे, ती तपशीलवार विश्लेषणानंतर आणि स्थायी समितीच्या शिफारशींचा विचार करून अधिक कठोर करण्याच्या दृष्टीने पालन केली जाते आणि जेव्हा असा लेखापरीक्षक फसवणूक करत असल्याचे आढळून येते आणि अशा फसवणुकीसाठी तो एनसीएलटी (NCLT) द्वारे काढून टाकला जातो. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कलम १४०(५) च्या पहिल्या भागांतर्गत एनसीएलटी (NCLT) ने अंतिम आदेश पारित केल्यावर आणि जर एखादा लेखापरीक्षक फसव्या कारवायांमध्ये गुंतलेला आढळला किंवा कंपनीच्या कर्मचारी व्यवस्थापन फसवणुकीस प्रवृत्त केल्याचे किंवा संगनमत केल्याचे आढळून आले तर कलम १४०(५)च्या दुसऱ्या तरतुदीनुसार प्रदान केलेले परिणाम पुढे येतील. त्यामुळे कलम १४०(५) ची दुसरी तरतूद लागू होण्यापूर्वी, कलम १४०(५) च्या पहिल्या भागानुसार कंपनीच्या लेखापरीक्षकाच्या विरोधात सविस्तर चौकशी होणे आवश्यक आहे तसेच एनसीएलटी

(NCLT) द्वारे असा निष्कर्ष निघणे आवश्यक आहे की कंपनीच्या लेखापरिक्षकाची, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसवणुकीची वृत्ती आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधाद्वारे त्याने कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन् दिले आहे किंवा संगनमत केले आहे.

६. आक्षेपित निर्णय आणि आदेशाद्वारे, जरी उच्च न्यायालयाने कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) चे अधिकार कायम ठेवले असले, तरी उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, एकदा लेखापरीक्षकाने लेखापरीक्षक म्हणून राजीनामा दिला की किंवा त्याच्या राजीनाम्यानुसार जर तो आता लेखापरीक्षक नसेल तर त्यानंतर कलम १४०(५) अन्वये कार्यवाही कायम ठेवण्यायोग्य नाही कारण कलम १४०(५) अंतर्गत भारत सरकारने दाखल केलेली याचिका लेखापरीक्षकाच्या त्यानंतरच्या राजीनाम्यामुळे समाधानकारक ठरते. उच्च न्यायालयाचा हा दृष्टिकोन पूर्णपणे चुकीचा आणि अव्यवहार्य मुळे कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही संपुष्टात येणार नाही. असें म्हणता येणार नाही की, लेखापरीक्षकाचा राजीनामा आणि/किंवा त्याला काढून टाकणे हा कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाहीचा शेवट आहे. अधिनियमाच्या कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार ज्या लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधाद्वारे त्याने कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन् दिले आहे किंवा संगनमत केले आहे, असे कलम १४०(५), २०१३ च्या कार्यवाहीखालील चौकशीअंती आणि लेखापरीक्षकाच्या वर्तनावर न्यायाधिकरणाद्वारे अंतिम आदेश पारित करण्याचे देखील संभाव्य परिणाम आहेत. त्यामुळे, कलम

१४०(५) च्या पहिल्या भागानुसार सुरू केलेली चौकशी/कार्यवाही त्याच्या तर्कशुध्द शेवटापर्यंत गेली पाहिजे आणि त्यानंतरचा राजीनामा आणि/किंवा लेखापरीक्षकाची खंडित सेवा यामुळे कलम १४०(५) अंतर्गत चौकशी/कार्यवाही संपुष्टात येणार नाही. उच्च न्यायालयाने दिलेल्या स्पष्टिकरणानुसार लेखा परिक्षकाने राजीनामा दिल्यास कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही संपुष्टात येइल आणि पुढील कार्यवाहीची गरज भासणार नाही, अशा परिस्थीतित लेखा परिक्षक कलम १४०(५) अंतर्गत दुसऱ्या तरतुदीनूसार अंतिम आदेश व त्याचे परिणाम टाळण्यासाठी राजीनामा देऊ शकतो. विधिमंडळाचा तो हेतू असू शकत नाही.

६. १ वर नमूद केल्याप्रमाणे, कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) ची दुसरी तरतूद ही जरी तरतूद म्हणून असली तरी ती एक ठोस तरतूद आहे आणि ती कलम १४०(५) च्या पहिल्या भागात न्यायाधिकरणाने पारित केलेल्या अंतिम आदेशावर लागू होईल आणि/किंवा अवलंबून असेल. जर उच्च न्यायालयचे प्रतिपादन मान्य केले की, लेखापरीक्षकाचा लगेच नंतरचा राजीनामा आणि/किंवा लेखापरीक्षकाची (सेवा) खंडित झाल्यावर कलम १४०(५) अन्वये कार्यवाही संपुष्टात येते आणि/किंवा कलम १४०(५) अन्वये केंद्र सरकारने केलेली याचिका यापुढे कायम राखण्यायोग्य नसेल आणि मान्य केली असेल तर त्या प्रकरणा, कलम १४०(५) ची दुसरी तरतूद नगण्य ठरेल आणि कोणत्याही परिस्थितीत कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत कोणतीही कारवाई केली जाणार नाही. उच्च न्यायालयाचे हे प्रतिपादन मान्य केल्यास कलम १४०(५) मध्ये दुसरी तरतूद समाविष्ट करण्याचा उद्देश आणि हेतू असफल होईल. वर म्हटल्याप्रमाणे कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीचा हेतू आणि उद्देश ही तरतूद अधिक कठोर करणे आणि अशा लेखापरीक्षकाला

परिणाम प्रदान करणे आहे, जेव्हा लेखापरीक्षक फसवणूक करत असल्याचे आढळून येते आणि अशा फसवणुकीसाठी तो एनसीएलटी (NCLT) द्वारे काढून टाकला जातो. या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार, न्यायाधिकरणाने दिलेल्या अंतिम आदेशानुसार, लेखापरीक्षक/संस्थेने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे किंवा कंपनी किंवा तिचे संचालक किंवा अधिकाऱ्यांद्वारे किंवा त्यांच्या संबंधी कोणत्याही फसवणुकीला प्रोत्साहन दिले आहे किंवा संगनमत केले आहे, तो/ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी '**कोणत्याही**' कंपनीचा लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास पात्र राहणार नाही. कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीत वापरलेला "**कोणताही**" हा शब्द विशेष आहे. न्यायाधिकरणाने अंतिम आदेश पारित केल्यानंतर, अशा लेखापरीक्षकाला केवळ कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून काढून टाकले जाणार नाही किंवा बदलले जाणार नाही, तर असा लेखापरीक्षक/संस्था देखील पाच वर्षांच्या कालावधीसाठी इतर '**कोणत्याही**' कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून नियुक्त होण्यास अपात्र असेल.

७. म्हणून, कायदा, २०१३ च्या कलम १४०(५) च्या खऱ्या व्याख्येनुसार आणि योजनेनुसार न्यायाधिकरणाने स्वेच्छेने किंवा केंद्र सरकारने किंवा संबंधित कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अर्जाच्या आधारे, कायद्याच्या कलम १४०(५) च्या पहिल्या भागांतर्गत एकदा चौकशी/कार्यवाही सुरू केली ती तर्कशुद्ध परिणामांपर्यंत पोहोचली पाहिजे आणि अशा चौकशी/कार्यवाहीदरम्यान लेखापरीक्षकाने राजीनामा दिला आहे की नाही या वस्तुस्थितीची पर्वा न करता न्यायाधिकरणाने अंतिम आदेश पारित करणे आवश्यक आहे की अशा लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या

पद्धतीने काम केले आहे की नाही. कलम १४०(५) च्या पहिल्या भागात दिल्याप्रमाणे कंपनीला लेखापरीक्षक बदलण्याचे निर्देश देणे हा न्यायाधिकरणाने नोंदवलेल्या निष्कर्षाचा केवळ एक परिणाम आहे की लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे. कलम १४०(५) (पहिला भाग) अंतर्गत अंतिम आदेशाचा हा पहिला परिणाम आहे.कंपनीच्या लेखापरीक्षकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे असा न्यायाधिकरणाने अंतिम आदेश दिल्यानंतर, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दुसरा परिणाम निदर्शनास येईल. त्यामुळे, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत प्रदान केलेल्या कोणत्याही परिणामांसाठी, कलम १४०(५) च्या पहिल्या भागानुसार न्यायाधिकरणाकडून चौकशीवर अंतिम आदेश राहील. त्यामुळे, खरे सांगायचे झाल्यास, कलम १४०(५) अंतर्गत चौकशी/कार्यवाहीदरम्यान किंवा त्यापूर्वीही कंपनीच्या लेखापरीक्षकाने राजीनामा दिल्यानंतरही, उच्च न्यायालयाने प्रतिपालन केल्याप्रमाणे आणि ठरवल्याप्रमाणे कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही संपुष्टात येणार नाही. पुनरावृत्तीच्या मोबदल्यात असे दिसून येते की, दिलेल्या प्रकरणात, खरे तर ज्या लेखापरीक्षकाने कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत पुढील कोणताही परिणाम टाळण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, फसव्या पद्धतीने काम केले आहे आणि कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीअंतर्गत होणारा कोणताही परिणाम टाळण्यासाठी जर तो राजीनामा देतो, तर अशी परवानगी दिली जाऊ शकत नाही.

८. लेखापरिक्षकांचे वतीने केलेल्या सादरीकरणाचा विचार करता कलम १४०(५) जरी नसले, तरी त्या बाबतीतही कोणताही लेखापरीक्षक फसवणूक, फसवणुकीला प्रोत्साहन किंवा व्यावसायिक गैरवर्तन इत्यादी करून सुटू शकत

नाही आणि ते कायद्याच्या कलम १३२, १४१, १४७, २४५ आणि ४४७ वर अवलंबून राहण्याशी संबंधित आहे, तर सुरुवातीला हे लक्षात घेणे आवश्यक आहे की उपरोक्त सर्व तरतुदी आणि कलम १४०(५) वेगवेगळ्या क्षेत्रात लागू होतात. वर दिल्याप्रमाणे, कलम १४०(५) एका विशेष उद्देशाने व हेतूने अधिनियमित करण्यात आले आहे. कलम १४०(५) ची दुसरी तरतूद विशेषतः असे प्रदान करते की एनसीएलटी (NCLT) ने अंतिम आदेश पारित केल्यानंतर असा लेखापरीक्षक पाच वर्षांच्या कालावधीसाठी इतर कोणत्याही कंपनीत लेखापरीक्षक होण्यासाठी पात्र राहणार नाही. म्हणूनच, केवळ लेखापरीक्षकाला कंपनीचे लेखापरीक्षक म्हणून इतर तरतुदीनुसार काढून टाकले जाऊ शकते म्हणून, कलम१४०(५) जे विशेष उद्देशाने अधिनियमित केले गेले आहे ते अनियंत्रित आणि/किंवा शक्तिबाह्य असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

९. आता कायद्याच्या कलम २४१(३) किंवा सादरीकरणावर अवलंबून राहिल्यास लेखा परीक्षकाने राजीनामा दिल्याच्या प्रकरणातही संबंधित लेखापरीक्षकाच्या विरोधात कायद्याच्या कलम २४१(३) अंतर्गत कारवाई केली जाऊ शकते आणि त्यामुळे कायद्याच्या कलम २४१(३) नुसार कार्यवाहीचा तोच परिणाम होईल आणि असे मानले जाईल की सदर लेखापरीक्षक इतर कोणत्याही कार्यालयात, जे वर्तन आणि कर्मचारी व्यवस्थापनाशी संबंधित आहे, नियुक्त करण्यासाठी 'योग्य आणि लायक व्यक्ती नाही'. सुरुवातीला हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कायद्याचे कलम २४१(३) संबंधित कंपनीबद्दल बोलते, इतर कोणत्याही कंपनीबद्दल नाही. कायद्याचे कलम २४१(३) हे दिनांक १४.०८.२०१९ ला सादर करण्यात आले आहे, जे केंद्र सरकारला न्यायाधिकरणाला घोषित करण्यास अधिकृत करते

कि अधिनियमाच्या कलम २४१(३) मध्ये नमूद केलेल्या व्यक्ती संचालकाचे पद धारण करण्यासाठी किंवा कोणत्याही कंपनीत जी वर्तनाशी आणि कर्मचारी व्यवस्थापन संबंधित आहे आणि इतर कोणत्याही पदावर राहण्यासाठी "योग्य आणि लायक व्यक्ती नाहीत". कायद्याचे कलम २४१(३) हे कलम २४३(१ए) आणि २४३(२) बरोबर अभ्यासणे आवश्यक आहे. उपरोक्त तरतुदींचे संयुक्त वाचन केल्यावर, हे स्पष्ट होते की कायद्याच्या कलम २४१(३) मध्ये विशेषतः "इतर कोणतेही कार्यालय जे कोणत्याही कंपनीच्या वर्तनाशी आणि कर्मचारी किंवा व्यवस्थापनाशी निगडित आहे" म्हणजे व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक किंवा इतर संचालक जसे की, मुख्य व्यवस्थापकीय कर्मचारी, परंतु लेखापरीक्षक नाही. कायद्याच्या कलम २४१(३) मध्ये वापरलेले शब्द म्हणजे "कंपनीचे आचरण आणि व्यवस्थापन २०१३ च्या अधिनियमाच्या योजनेनुसार, विशेषतः दहाव्या प्रकरणानुसार, लेखापरीक्षक खात्यांचा स्वतंत्र परीक्षक म्हणून काम करतो आणि त्याने कंपनीचे आचरण आणि कर्मचारी व्यवस्थापन पद धारण केले आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, या निवेदनाला काहीही अर्थ नाही कि लेखा परीक्षकाने राजीनामा दिल्यानंतरही, २०१३ च्या कायद्याच्या कलम १४० (५)अंतर्गत जे साध्य करता येईल, ते कलम २४१(३) द्वारे साध्य करता येईल.

१०. या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कलम १४०(५)मध्ये हे विशेषतः नमूद केले आहे कि "या कायद्याच्या किंवा सध्या लागू असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखालील कोणत्याही कारवाईवर पूर्वग्रह ठेऊ नये". त्यामुळे कलम १४०(५) अंमलात आणताना विधिमंडळाचा हेतू अगदी स्पष्ट आहे आणि कलम १४०(५) अंतर्गत न्यायाधिकरणाला दिलेले अधिकार कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदींखालील कोणत्याही कारवाईवर

किंवा सध्या अंमलात असलेला असलेल्या इतर कोणत्याही कायद्याबाबतीत पूर्वग्रह न ठेवता असतील. त्यामुळे, २०१३ च्या कायद्यातील इतर कोणत्याही तरतुदींची पर्वा न करता, न्यायाधिकरणाकडे कायद्याच्या कलम १४०(५) अंतर्गत कंपनीच्या अशा लेखापरीक्षकाच्या विरोधात अंतिम आदेश पारित करण्याचे अधिकार आहेत ज्याच्यावर हा आरोप आहे कि त्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या पद्धतीने काम केले आहे.

११. वरील नमूद केलेल्या कारणास्तव, उच्च न्यायालयाने बीएसआर (BSR), डेलॉईटच्या आणि लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यावर आणि कलम १४०(५) अंतर्गत नवीन लेखा परीक्षकांच्या नियुक्तीबाबतचा अर्ज कायम ठेवण्यायोग्य राहणार नाही असा निर्णय देतांना भौतिक चूक केली आहे. परिणामी, उच्च न्यायालयाने एनसीएलटी / एनसीएलएटी (NCLT / NCLAT) ने दिलेले आदेश रद्द करण्यात चूक केली आहे ज्याद्वारे एनसीएलटी /एनसीएलएटी (NCLT/NCLAT) ने असे म्हटले आहे कि लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतरही, कलम १४०(५) अंतर्गत चौकशीची कार्यवाही कायम ठेवली जाईल किंवा सुरु ठेवली जाईल. वर नमूद केल्याप्रमाणे, लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतरही आणि/किंवा लेखापरीक्षकाचा राजीनामा देऊनही कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीच्या उद्देशाने, कलम १४०(५) अंतर्गत चौकशी/कारवाई / अर्ज (पहिला भाग) कायम आणि चालू राहील आणि कलम १४०(५) मध्ये प्रदान केल्याप्रमाणे, एनसीएलटी (NCLT) द्वारे पारित केलेल्या अंतिम आदेशावर, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार प्रदान केलेल्या परिणामाचे पालन केले जाईल. एनसीएलटी (NCLT) किंवा उच्च न्यायालय या दोघांनीही संबंधित लेखापरीक्षकांवरील आरोपांच्या गुणवत्तेकडे लक्ष दिले नाही आणि

एनसीएलटी (NCLT) आणि उच्च न्यायालयाचा निर्णय लेखा परीक्षकांच्या राजीनाम्यानंतर कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाहीच्या समर्थनीयतेवर असल्याने, आम्ही लेखापरीक्षकांवरील आरोपांच्या गुणवत्तेवर काहीही विचार करण्यापुसून परावृत्त होतो कारण केंद्र सरकारने  कलम १४०(५) अंतर्गत केलेल्या अर्जातील गुणवत्तेवर न्यायधिकरणाने फसवणूक इत्यादींचे  आरोप अद्याप विचारात घेतले नाहीत.

१२.    आता जोपर्यंत कायदयाच्या कलम १४०(५) च्या अधिकारांना आव्हान देण्याचा प्रश्न आहे, हे लक्षात घ्यावे की उच्च न्यायालयाने, कलम १४०(५) ची घटनात्मक वैधता / अधिकार कायम ठेवले आहे, ज्याच्या विरोधात बीएसआर (BSR) ने कोणतीही विशेष  अनुमती याचिका दाखल केलेली नाही. अन्यथा गुणवत्तेवर देखील, जेव्हा काही रिट याचिकाकर्त्यांनी कलम १४०(५) च्या घटनात्मक वैधतेबद्दल / उच्च न्यायालयाने दिलेल्या आक्षेपित निर्णयाला आणि आदेशाला आव्हान दिले आहे, तेव्हा आमचे असे मत आहे की कलम १४०(५) हा युक्तिवाद केल्याप्रमाणे अतिशयोक्तीपूर्ण आणि /किंवा स्पष्द्दणे मनमानी  असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.  कलम १४०(५) च्या घटनात्मकता/विषयांवर मूळ रिट याचिकाकर्त्यांच्या वतीने खटला होता की कलम १४०(५) अतिरेक आणि मनमानी  आहे कारण ते फसवणुकीच्या गंभीर गुन्ह्याच्या आणि विधितः मृत्यूप्रमाणे गंभीर परिणामासह अनिवार्य अपात्रेच्या परिणामाचे निर्धारण करण्यासाठी दिशाहीन मार्गदर्शन आणि अनियंत्रित अधिकार प्रदान करते. वर नमूद केलेल्या गोष्टीला काहीही अर्थ नाही. येथे नमूद केल्याप्रमाणे, एनसीएलटी (NCLT ) कलम १४०(५) अंतर्गत न्यायिकवत अधिकारांचा वापर दिवाणी न्यायालयासारख्या सर्व अधिकारांसह

करेल. कोणताही अंतिम आदेश पारित करण्यापूर्वी पूर्वी एनसीएलटी ( NCLT )ने पुरेशी संधी दयावी.

१३. आता आणखी एका निवेदनाप्रमाणे, कलम १४०(५) हे भारतीय राज्य घटनेचे अनुच्छेद १४ चे उल्लंघण करणारे आहे आणि संचालक, व्यवस्थापक इत्यादी सारख्याच अभिकथित अयोग्य कृत्य करणाऱ्याच्या तुलनेत लेखापरिक्षकांशी अन्यायकारकपणे भेदभाव करते. हे लक्षात घेणे आवश्यक आहे कि लेखापरीक्षकाच्या भूमिकेची तुलना संचालक आणि / किंवा व्यवस्थापन बरोबर केली जाऊ शकत नाही. लेखापरीक्षक कंपनीच्या कारभारात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात आणि म्हणून त्यांनी मोठ्या सार्वजनिक लोक हितासाठी आणि गुंतवणूकदार इत्यादीसह इतर सर्व भागधारकांसाठी काम करावे लागते. कायदयाचे १० वे प्रकरण विशेषत: लेखापरीक्षकांचे महत्त्व पाहणाऱ्या"लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षकांसाठी" ("ऑडिट आणि ऑडिटर्स") साठी आहे. म्हणून, कलम १४०(५) हे भेदभाव करणारे आणि/किंवा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारे आहे असे म्हणता येणार नाही.

१४. आता लेखा परीक्षकांना आणि भागीदारासह संपूर्ण संस्थेला स्वयंचलितपणे अपात्र ठरवण्याच्या स्वरूपात आणि तो देखील इतर कोणत्याही कंपनीचा लेखापरीक्षक होण्यासाठी पाच वर्षाच्या कालावधीसाठीचा दंड अत्यंत असमान आहे या निवेदनाचा विचार करता, शेवटी विधिमंडळ /संसद ने बंदी घालण्याची तरतूद करावी . संयुक्त आणि गंभीर तत्त्वावर, लेखा परीक्षक आणि भागीदारांसह संपूर्ण संस्था जबाबदार असेल आणि म्हणून ते कलम १४०(५) आणि कायदा, २०१३ च्या कलम

१४०(५) मध्ये नमूद केलेल्या परिणामांच्या आधीन असू शकते. अपात्रता ही विधितः मृत्यू सारखीच आहे आणि कलम १४०(५) बीएसआर (BSR) आणि त्याच्या भागीदाराच्या व्यवसाय चालू ठेवण्याच्या मुलभूत अधिकारांवर आक्षेप घेते, ज्यावर घटनेच्या कलम १९(१)(जी) नुसार हमी दिलेली आहे. असे म्हणण्याची परवानगी कोणालाही दिली जाऊ शकत नाही की फसवणूक, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे करूनही, त्यांना त्यांचा व्यवसाय सुरू ठेवण्याचा आणि / किंवा पुढे चालू ठेवण्याचा अधिकार होता.एखाद्या लेखापरीक्षकाद्वारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फसव्या रीतीने वागणे हा एक अतिशय गंभीर गैरवर्तन आहे आणि म्हणून अश्या फसव्या कृत्यामध्ये सहभागी होण्याचे आवश्यक परिणाम पुढे येतील. या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे, वर नमूद केल्याप्रमाणे, कायदयाचे कलम १४०(५) येथे नमूद केलेल्या विशिष्ट उद्दिष्ट आणि हेतू अधिनियमीत केले गेले आहे आणि योग्य विचारविमर्शानंतर आणि स्थायी समितीच्या तसेच संबंधित भागधारकांच्या शिफारशी विचारात घेऊन ते अधिनियमीत केले गेले आहे. म्हणून, कायद्याचे कलम १४०(५) ज्या उद्देशाने व हेतूने लागू केले आहे ते विचारात घेता, अभिकथित केल्याप्रमाणे भारतीय राज्य घटनेचे अनुच्छेद १४ चे मनमानी, अतिरेक आणि उल्लंघन करणारे आणि/किंवा भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(जी) अंतर्गत हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारे असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही .

१५. आता उच्च न्यायालयाने आपल्या आक्षेपित निकाल आणि आदेशाद्वारे कलम २१२(१४) चे निर्देश रद्दबातल करणे या संदर्भात असे दिसते कि उच्च न्यायालयाने प्रामुख्याने दोन कारणांवर २१२ (१४) निर्देश रद्दबातल केले आहे . प्रथम, आयएफआयएन एसएफआयओ (IFIN

SFIO) अहवालाच्या ३० तासाच्या आत खटला चालविण्याचे निर्देश जारी करण्यात आले होते ते बुद्धीचा वापर न केल्याचे दर्शविते आणि दुसरे म्हणजे आयएफआयएन एसएफआयओ (IFIN SFIO) अहवाल हा अपूर्ण होता कारण तपास पूर्ण झाला नव्हता आणि त्यामुळे २१२(१४) निर्देश अक्षम होते.

१५.१ उच्च न्यायालयाच्या तर्कातून असे दिसते की उच्च न्यायालयाने कलम २१२(१४) अन्वये दिलेला निर्देश रद्द केला आहे आणि याला बुद्धीचा वापर न करणे असे म्हटले आहे कारण अंदाजे ७५० पानांचा आणि ३२००० पानांची जोडपत्र असलेला अहवाल ३० तासांत विचारात घेणे अशक्य होते. उच्च न्यायालयाने असेही निरीक्षण केले की बुद्धीचा वापर दर्शवण्यासाठी संबंधित तथ्ये आणि कागदपत्रे अभिलेखावर ठेवली गेली नाहीत. वरील निष्कर्षासह उच्च न्यायालयाने असे निरीक्षण केले आहे की तपास संस्थेनुसार, एसएफआयओ (SFIO) अहवाल हा अंतरिम अहवाल होता, जो केंद्र सरकारनेही मागितला होता.

१५.२ आता पर्यंत उच्च न्यायालयाने आयएफआयएन एसएफआयओ ( IFIN SFIO) चा अहवाल मिळाल्यानंतर ३० तासांच्या आत खटला चालविण्याचे निर्देश जारी करणे बुद्धीचा वापर न करणे दाखवितो कारण अंदाजे ७५० पानांचा आणि ३२००० पानांची जोडपत्र असलेला अहवाल ३० तासांत विचारात घेणे अशक्य होते.त्यामुळे उच्च न्यायालयाने केलीली निरीक्षणे स्वीकारली जाऊ शकत नाही. केवळ ३० तासांच्या आत खटला चालविण्याचे निर्देश जारी करण्यात आले होते त्यामुळे बुद्धीचा वापर केला गेला नाही असे गृहीत धरले जाऊ शकत नाही. अधिकाऱ्याने सविस्तर नोंद तयार केली होती जी शेवटी अंतिम प्राधिकरणासमोर ठेवली गेली ज्याने शेवटी निर्णय घेतला आणि खटला चालवण्याचे निर्देश जारी केले. खटला

चालविण्यासाठी काही साहित्य आहे कि नाही आणि खटला चालविण्याचे निर्देश योग्यरीत्या देण्यात आले होते कि नाही हे विचारात घेणे आवश्यक आहे. सुनावणीदरम्यान, आरोपीला त्याचा खटला मांडण्यासाठी पुरेशी संधी दिली जाईल. त्यामुळे, उपरोक्त आधारावर, उच्च न्यायालयाने कायदाच्या कलम २१२(१४) अंतर्गत जारी केलेले खटला चालविण्याचे निर्देश रद्द करून चूक केली आहे.

आत्तापर्यंत उच्च न्यायालयाने नोंदविलेले निरिक्षण, की संबंधित तथ्ये आणि बुद्धीचा वापर दर्शविण्यासाठी कागदपत्रे अभिलेखावर ठेवली गेली नाहीत, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की खटला चालविण्याचा अंतिम आदेश अभिलेखावर ठेवण्यात आला होता ज्यामध्ये आयएफआयएन एसएफआयओ (IFIN SFIO) अहवालात हे विशेषतः नमूद केले गेले आहे.

१५.३ आता आणखी एका आधारावर ज्याच्या दिशेने /खटला चालविण्याची मंजुरी उच्च न्यायालयाने रद्द केली आहे, म्हणजे तो एक अपूर्ण तपास अहवाल होता आणि त्यामुळे असा अपूर्ण तपास अहवालाबाबत ,खटला चालविण्याचे कोणेतेही निर्देश/ मंजुरी जारी केली जाऊ शकत नाही, सुरवातीला, हे लक्षात घेणे आवश्यक आहे कि उच्च न्यायालयाने आकलन केले नाही कि एसएफआयओ आयएफआयएन (IFIO IFIN) अहवाल हा एसएफआयओ (SFIO) ने आएफआयएन (IFIN) तपासाखाली असलेल्या कंपन्यांपैकी एक ची चौकशी पूर्ण केल्यावर केलेला होता. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की ३०.०९.२०१८ च्या आदेशानुसार, एसएफआयओ (SFIO) द्वारे आयएलआणिएफएस (IL&FS) आणि त्यांच्या उपकंपन्यांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिले होते ज्यात अंदाजे १००-१६० संस्थांचा समावेश

आहे. आयएफआयएन (IFIN) चा संबंध आहे , ती आयएलआणि एफ एस (IL&FS) समूहातील आणि वित्तीय सेवा शाखेतील उपकंपन्यांपैकी एक होती. केंद्र सरकारच्या वतीने हे प्रकरण आहे की जोपर्यंत एसएफआयओ ( SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवालाचा संबंध आहे, तो आयएफआयएन (IFIN )च्या संदर्भात तपास पूर्ण झाल्यानंतरचा अभिलेख आहे. फक्त कारण आतापर्यंत आयएलआणिएफएस (IL&FS) समुहाच्या इतर उपकंपन्यांबाबत तपासाचा संबंध आहे, तोच चालू असावा, या टप्प्यावर आयएफआयएन (IFIN )चा संबंध आहे तो अहवाल अपूर्ण होता आणि ज्यासाठी तपास सुरु होता. हे निरीक्षण करण्यासाठी आधार असू शकत नाही. उच्च न्यायालयाने वरील गोष्टीचे योग्य आकलन केले नाही आणि आयएफआयएन ( IFIN) च्या बाबतीत हा अहवाल अंतरिम अहवाल असल्याचे चुकीचे मानले आहे. या टप्पयावर हे लक्षात घेणे आवश्यक आहे कि एसएफआयओ (SFIO) आयएफआयएन (IFIN) अहवालातच असे दिसून आले आहे कि आयएलआणि एफएस ( IL&FS)समूहाची गुंतागुंतीची रचना आणि संस्थांमधील परस्पर संबंधाबाबत आयएलआणि एफएस (IL&FS) च्या इतर समूह कंपन्यांच्या तपासादरम्यान आयएफआयएन (IFIN) च्या पुढील घटना किंवा व्यवहार उघड झाल्यास, पुढील अहवाल दाखल केला जाईल. त्यामुळे उच्च न्यायालयाने आयएफआयएन (IFIN) बाबतचा तपास अपूर्ण असल्याचे चुकीचे ठरवले आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की एसएफआयओ (SFIO) ने आयएफआयएन (IFIN) च्या सविस्तर आणि विस्तृत तपासणीनंतर अहवाल सादर केला होता. हरी संकरन यांच्यासह प्रत्येक रिट याचिकाकर्त्यांविरुद्ध अनेक भंग, वैधानिक कर्तव्यांचे उल्लंघन आणि फसव्या आचरणाकडे लक्ष वेधणाऱ्या निर्णायक निष्कर्ष आहेत. आम्ही तपशीलवार विस्तारपणे सांगत नाही कारण खटला

चालवणे बाकी आहे आणि संबंधित व्यक्तींवर खटला चालवायचा आहे. उच्च न्यायालयासमोर कार्यवाही कलम २१२(१४) अन्वये खटला चालवण्यास आणि खटला चालवण्यास परवानगी देण्याचा निर्देशाच्या टप्प्यावर होती. ज्या संबंधित आरोपीविरुद्ध कंपनी कायदाच्या कलम ४४७ आणि भारतीय दंड संहिता च्या इतर संबंधित तरतुदीनुसार दंडनीय गुन्ह्यांसाठी खटला चालविण्याचे आदेश देण्यात आले होते,त्यांना पुरेशी संधी उपलब्ध असेल. त्यामुळे ,उच्च न्यायालयाने या टप्प्यावर आणि उपरोक्त कारणांवर खटला चालविण्याचे कलम २१२(१४) अंतर्गत दिलेले निर्देश रद्द करून चूक केली आहे.

**निष्कर्ष**

१६. वरील बाबी लक्षात घेऊन आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४०(५) च्या घटनात्मक वैधतेस आव्हान देणे अयशस्वी ठरले आहे.आणि असे आढळून आले आहे आणि असे म्हटले आहे की अभिकथित केल्याप्रमाणे, कलम १४०(५) हे भेदभाव किंवा मनमानी करणारे नाही आणि भारताच्या घटनेच्या अनुच्छेद १४, १९(१)(जी) चे उल्लंघन करणारे नाही. लेखापरीक्षांनी राजीनामा दिला आहे आणि त्यामुळे त्यानंतर तो कायम राखण्यायोग्य नाही हे रद्दबातल केले या आधारावर कलम १४०(५) अंतर्गत केलेला अर्ज/कार्यवाही रद्द करणारा उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निर्णय आणि आदेश याद्वारे रद्द करण्यात येतो. परिणामी , लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतरही , कलम १४०(५) अंतर्गत कार्यवाही कायम राखण्यायोग्य असेल,असा एनसीएलटी चा आदेश रद्द करून उच्च न्यायालयाचा आक्षेपित निर्णय आणि आदेश याद्वारे रद्द केला जातो. संबंधित लेखापरीक्षकांच्या राजीनाम्यानंतरही, २०१३ चा कायदयाचे कलम १४०(५)

अंतर्गत अर्ज/कार्यवाही कायम राखण्यायोग्य असल्याचे मानले जाते आणि त्यामुळे आता एनसीएलटी  (NCLT)ने कायदयानुसार चौकशी केल्यानंतर अश्या अर्जावर अंतिम आदेश पारित करावा आणि त्यानंतर अशा अंतिम आदेशाच्या आधारावर, कलम १४०(५) च्या दुसऱ्या तरतुदीनुसार प्रदान केल्यानुसार पुढील परिणामांचे पालन केले जाईल. तथापि हे स्पष्ट केले आहे कि आम्ही संबंधित लेखापरिक्षांवरील आरोपांच्या गुणवत्तेवर काहीही  व्यक्त केलेले नाही आणि शेवटी एनसीएलटी/न्यायाधिकरणाने अंतिम आदेश केंद्र सरकारने दाखल केलेल्या कायदा कलम १४०(५) अर्जावर पारित करावा.

१७.  वरील बाबी लक्षात घेऊन आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, युनिअन ऑफ इंडिया ने एसएफआयओ (SFIO) ला जारी केलेले कंपनी कायदा, २०१३ च्या कलम २१२(१४),२९/०५/२०१९ अंतर्गत जारी केलेला निर्देश उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निर्णय आणि आदेश याद्वारे रद्द केला जातो. विशेष  न्यायालय (कंपनी कायदा) आणि अतिरिक्त सत्र न्यायधीश, बृहन्मुंबई यांच्या फाईल वर एसएफआयओ (SFIO) ने फौजदारी तक्रार सी सी क्र. २०/२०१९ द्वारे दाखल केलेला खटला उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित निर्णय आणि आदेश या द्वारा रद्द केला जातो. आता उक्त फौजदारी तक्रार सीसी क्र. २०/२०१९ संबंधित न्यायचौकशी न्यायालयाद्वारे कायदयाने आणि स्वतःच्या गुणवत्तेवर पुढील कार्यवाही केली जावी .

१८.   त्यानुसार, वरील बाबी लक्षात घेता, युनियन ऑफ इंडियानी दाखल केलेली अपील म्हणजे फौजदारी अपील क्र. २३०५-२३०७/२०२२, २३०२-२३०३/२०२२  २३००/२०२२ याद्वारे मान्य केल्या आहेत आणि डेलॉइट आणि त्याच्या भागीदारांनी दाखल केलेली फौजदारी अपील क्र. २२९८/२०२२,

२२९९/२०२२ आणि २३०४/२०२२, तसेच दिवाणी अपील क्र. ७९३/२०२२, ८०१/२०२२ आणि ८७७/२०२२ याद्वारे फेटाळले जातात.

अपिले निकाली काढले .

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".